- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४२,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,२६,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर
संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 Mail Id : sinhvanivrutta@gmail.com दिनांक : रविवार, १५ नोव्हेंबर २०२६ Epaper : epaper.sinhvani.com पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३३५ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

आमच्याकडून पुर्णविराम! सुळेंनी विलिनीकरणाचा विषय संपवला

माझा भाऊ गेला अन् त्या चर्चांना फुल स्टॉप लागला

वृत्तसंस्था, मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलिनीकरणाबाबत सुरू असलेल्या चर्चांना आज पत्रकार परिषदेत फुल स्टॉप दिला. त्यांनी ज्या काही चर्चा सुरू होत्या त्या माझ्या भावासोबत दिवंगत अजित पवार यांच्यासोबत सुरू होत्या. २८ जानेवारीला माझा भाऊ गेला अन् त्या चर्चांना फुल स्टॉप लागला. त्यानंतर आमच्याकडून कोणत्याही चर्चा झालेल्या नाहीत असे म्हणत आता या चर्चांचा कंटाळा आला आहे. आमच्याकडून हा विषय संपला असल्याचं उद्विग्नपणे सांगितले.

गेल्या दोन दिवसांपासून राज्याच्या राजकारणात मोठी घटना घडणार, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येणार अशी चर्चा सुरू झाली होती. शरदचंद्र पवार गट हा एनडीएमध्ये जाणार कोणाला मंत्रीपद मिळणार याच्या चर्चा सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज पत्रकार परिषद घेत.

सध्या विलिनीकरणाबाबत पवार कुटुंबाकडून कोणतीही चर्चा सुरू नाहीये असं सांगितलं. त्यांनी अजित पवार हयात होते त्यावेळी याबाबत चर्चा झाली होती अन् ती जगजाहीर झाली होती. असं सांगत ती चर्चा भावासोबतची होती आता भाऊच नाही म्हटल्यावर कोणती चर्चा नाही असे भावून होत सुप्रिया सुळे



यांनी ठणकावून सांगितले.

सुप्रिया सुळे यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक घडोमोडी घडत आहेत. त्याबाबत दिल्लीत देखील याचा देशावर होणारा परिणाम याबाबत चर्चा सुरू आहे. त्या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, काँग्रेसचे नेतृत्व तसेच शिवसेना उबाठा अ-तृणमूल काँग्रेसचे देखील खासदार जेपीसीच्या माध्यमातून चर्चा करत आहेत. त्यासाठी सत्ताधारी आणि विरोधक यांच्या भेटीगाठी होत असतात असं म्हणत कथित बैठकांबाबत खुलासा केला.

पत्रकार परिषदेत सुप्रिया सुळे यांनी डीलिमिटेशनबाबत देखील आपली भूमिका काही प्रमाणात स्पष्ट केली. याच डीलिमिटेशन बीलसाठीच सत्ताधारी भाजपला राष्ट्रवादीच्या ८ खासदारांची गरज असल्याचा तर्क गेल्या काही दिवसांपासून दिला जात होता. त्यासाठीच हे विलिनीकरणाचा घाट घातला जात असल्याचे विश्लेषण अनेक जाणकारांनी केलं होतं.

आता याबाबत सुप्रिया सुळे म्हणाल्या, मला ढोबळमानाने डीलिमिटेशन ठीक वाटलं. कारण आमचे मतदार संघ हे २० ते २५ लाखांचे झाले आहेत. इतके मोठे मतदार संघ कोणत्याही खासदाराला मॅनेज करणे अवघड आहे. जर सरसकट जागा ५० टक्क्यांनी वाढल्या तर डीलिमिटेशनला पाठिंबा देण्याबाबत विचार करू असे सुचक उत्तर दिले.

थोडक्यात

मुलाकडून वृद्ध आईची हत्या

मुंबई : घरखर्चावरुन होणाऱ्या भांडणातून रागाच्या भरात एका तरुणाने त्याच्याच वृद्ध आईची बेदम मारहाण करुन हत्या केली. हल्ल्यात जखमी झालेल्या साधना भोलेनाथ कारंडे या ६२ वर्षांच्या महिलेचा शुक्रवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यामुळे बांगुरनगर पोलिसांनी आता आरोपी मुलगा अभिषेक भोलेनाथ कारंडेवर (२८) हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. याच गुन्ह्यात तो सध्या पोलीस कोठडीत असून त्याची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. साधना तिच्या पती आणि मुलांसोबत गोरेगाव येथील लक्ष्मीनगर, महाकाली मंदिरामागील पुर्नवासी गल्लीतील रुम क्रमांक सातमध्ये राहत होती. गेल्या वर्षी तिला अर्धांगवायू झाल्याने ती घरीच असते. तिचा मोठा मुलगा प्रथमेश हा राजस्थान येथे राहत असून अभिषेक हा तिचा लहान मुलगा आहे. त्याला दारु पिण्याचे व्यसन होते. त्यातून तो घरात शिवीगाळ करुन सर्वांशी वाद घालण्याचा प्रयत्न करत होता. गेल्या आठवड्यात प्रथमेश दिवाळी सणानिमित्त मुंबईत आला होता.

पारंपरिक कुंभार समाजाला सरकारचा दिलासा, ७०० ब्रास माती उत्खननावर रॉयल्टी माफ

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय, सरकारकडून सर्वसमावेशक धोरण जाहीर

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

पिढीजात कुंभार समाजाला विटा, कौले आणि इतर पारंपरिक वस्तू तयार करण्यासाठी वर्षाला ७०० ब्रासपर्यंत माती उत्खननावर रॉयल्टीमध्ये सूट देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून कुंभार समाजाला देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आता सर्वसमावेशक धोरण ठरविण्यात आले आहे.



गावातील तलाव, पाझर तलाव आणि शेतकऱ्यांच्या शेतातील माती किंवा गाळ स्वखर्चाने नेल्यास रॉयल्टी न आकारण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. या सवलतींचा लाभ घेण्यासाठी 'महाखनिज' प्रणालीवरून तहसीलदारांकडे अर्ज करून १५ दिवसांत पाच वर्षांची वैधता असलेले स्वतंत्र ओळखपत्र कुंभार समाजातील व्यक्तींना मिळवता येईल. याशिवाय माती उत्खनन आणि वाहतुकीचे परवाने ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात येणार असून, वाहतुकीसाठी विनामूल्य पास मिळणार आहे.

कुंभार व्यावसायिकांसाठी जिल्हास्तरावर 'एक खिडकी योजना' राबवून सरकारी जागांवर क्लस्टर उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच औष्णिक विद्युत केंद्रांमधून पॉण्ड ॲश (राख) सवलतीच्या दरात म्हणजेच प्रतिटन १०० रुपयांत उपलब्ध करून दिली जाईल.

प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती स्थापन करण्यात येणार असून, यामध्ये समाजाच्या प्रतिनिधींना सहभागी करून घेण्यात येणार आहे.

दोन वर्षे घाणेरड्या फ्लॅटमध्ये ७१ मांजरींना कोंडून ठेवले

वृत्तसंस्था, सिंगापूर

माणुसकीला काळीमा फासणारी एक अत्यंत अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. सिंगापूरमध्ये एका ३३ वर्षीय महिलेने आपल्या पूर्वाश्रमीच्या पतीसोबत मिळून तब्बल दोन वर्षे एका बंद आणि घाणेरड्या फ्लॅटमध्ये ७१ मांजरींना बंद केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अन्न-पाण्यावाचून तडफडल्याने यातील ९ मांजरींचा मृत्यू झाला, तर डझनभर मांजरी कुपोषणामुळे




अक्षरशः सांगाडा बनल्या होत्या.

या क्रूरतेप्रकरणी सिंगापूरच्या न्यायालयाने नूरल नादिया नूर मोहम्मद (वय ३३) हिला प्राण्यांना अनावश्यक वेदना आणि यातना दिल्याच्या आरोपाखाली दोषी ठरवत १६ आठवड्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली आहे. तसेच, पुढील १२ महिन्यांपर्यंत कोणत्याही पाळीव प्राण्याला जवळ बाळगण्यावर तिला बंदी घालण्यात आली आहे.

वजनकाट्यांमध्ये रिमोट किटचा सुळसुळाट! नागपूर विभागात शेतकऱ्यांची सर्रास लूट?

कळमना ते भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूरपर्यंत वजनमापातील फेरफाराचे आरोप, वैधमापनशास्त्र विभागाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह!













रिमोटचे प्रकार : पेन, कॅल्क्युलेटर, कार की, लिटर होल्ड, मोबाईल असे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत.

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर विभागात इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांमध्ये रिमोट कंट्रोल किट बसवून वजनामध्ये फेरफार करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात होत असल्याच्या तक्रारी आणि घटना समोर येत आहेत. या प्रकारामुळे शेतकरी, सर्वसामान्य ग्राहक तसेच प्रामाणिक व्यापाऱ्यांची आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. वजनमापामध्ये तांत्रिक फेरफार करून प्रत्यक्ष वजनापेक्षा कमी वजन दाखविण्याच्या प्रकारामुळे शेतकऱ्यांच्या कष्टाच्या कमाईवर थेट डल्ला मारला जात असल्याचे चित्र आहे.

कळमना मार्केटमध्ये धान्य व भाजीपाला विक्रीत शेतकऱ्यांची लूट?

नागपूर येथील प्रसिद्ध कळमना कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात धान्य खरेदी-विक्री तसेच भाजीपाला व्यापारामध्ये वजनकाट्यांतील कथित सेटिंग आणि रिमोट किटच्या वापराबाबत अनेक तक्रारी समोर आल्या आहेत. विशेषतः भंगार (स्क्रॅप) खरेदी करणाऱ्या काही व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यांमध्ये अशा प्रकारची यंत्रणा वापरली जात असल्याचे आरोप आहेत. काही स्थानिक उत्पादकांकडून विशिष्ट विक्रेत्यांना अशा प्रकारच्या बेकायदेशीर किटचा पुरवठा होत असल्याच्याही तक्रारी आहेत. या आरोपांची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे.

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत धान खरेदीच्या व्यवहारांवर संशय

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांत गावोगावी जाऊन तसेच शेतकऱ्यांच्या घरी जाऊन धान खरेदी करणाऱ्या काही व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यांमध्ये रिमोट किट आणि वजनामध्ये फेरफार करणारी यंत्रणा असल्याचे प्रकार निदर्शनास आल्याच्या तक्रारी आहेत. या संदर्भातील काही व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्याचे तसेच स्थानिक वृत्तमाध्यमांनीही या विषयाला प्रसिद्धी दिल्याचे सांगण्यात येत आहे. धान उत्पादक शेतकरी आधीच उत्पादन खर्च, मजुरी आणि बाजारभावाच्या समस्यांनी त्रस्त असताना वजनामध्येच फसवणूक होत असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे.

वर्धा, पुलगाव, वणी आणि चंद्रपूरमध्येही प्रकार वाढल्याच्या तक्रारी

वर्धा आणि पुलगाव परिसरात कापूस खरेदी-विक्री करणाऱ्या काही व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यांमध्ये रिमोट किट बसवून वजनात फेरफार होत असल्याच्या तक्रारी आहेत. त्याचप्रमाणे वणी आणि चंद्रपूर परिसरात स्क्रॅप खरेदी करणाऱ्या काही व्यापाऱ्यांच्या वजनकाट्यांमध्येही कथित बेकायदेशीर फेरफार होत असल्याचे आरोप पुढे आले आहेत. नागपूर विभागातील विविध जिल्ह्यांमध्ये अशा प्रकारच्या तक्रारी आणि व्हिडिओ समोर येत असताना संबंधित यंत्रणेकडून व्यापक तपासणी आणि ठोस कारवाई का होत नाही, हा सर्वसामान्यांना पडलेला प्रश्न आहे.

उत्पादक आणि विक्रेत्यांच्या कथित साखळीची चौकशी कधी?

या संपूर्ण प्रकरणात नागपूर येथील एका उत्पादकासह त्यांच्याशी संबंधित काही विक्रेत्यांच्या माध्यमातून अशा प्रकारच्या रिमोट किटचा पुरवठा होत असल्याचे आरोप करण्यात येत आहेत. या आरोपांची सत्यता तपासण्यासाठी संबंधित उत्पादक, विक्रेते, किटचा पुरवठा, विक्रीची बिले आणि वजनकाट्यांमध्ये केलेले तांत्रिक बदल यांची स्वतंत्र चौकशी होणे गरजेचे आहे.

विभागाला या प्रकारांची माहिती असूनही प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप परवानाधारक आणि तक्रारदारांकडून केला जात आहे. जर या तक्रारींमध्ये तथ्य असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यास विलंब का होत आहे? कोणाच्या दबावामुळे किंवा कोणाच्या हितसंबंधांमुळे अशा प्रकारांकडे दुर्लक्ष केले जात आहे का? असे गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

स्थानिक नेत्यांनी आवाज उठवूनही कारवाईचे काय?

या प्रश्नावर काही स्थानिक लोकप्रतिनिधींनी आणि नेत्यांनी आवाज उठविला होता. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्षात व्यापक तपासणी, दोषींवर कठोर कारवाई आणि अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना झाल्याचे दिसून येत नसल्याच्या तक्रारी आहेत. अनेक नागरिक आणि व्यापाऱ्यांनी यासंदर्भात तक्रारी केल्याचे सांगितले जाते. मात्र, त्या तक्रारींवर नेमकी कोणती कारवाई झाली, किती वजनकाटे तपासले गेले, किती प्रकरणांत फेरफार आढळला आणि किती जणांवर गुन्हे दाखल झाले, याची माहिती सार्वजनिक होणे आवश्यक आहे.

ग्राहक संरक्षण विभाग की केवळ नावापुरता विभाग?

वैधमापनशास्त्र विभागाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे ग्राहकांचे संरक्षण करणे, अचूक वजनमाप सुनिश्चित करणे आणि वजनमापातील फसवणूक रोखणे हे आहे. मात्र, शेतकरी आणि ग्राहकांची खुलेआम आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारी असूनही कारवाई होत नसेल, तर या विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणे स्वाभाविक आहे.

हा विभाग ग्राहकांच्या संरक्षणासाठी आहे की गैरप्रकार करणाऱ्यांच्या पाठीशी उभा राहण्यासाठी? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे.

नागपूर विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेचीही चौकशी होणे गरजेचे आहे. या प्रकरणात कोणाचे आर्थिक हितसंबंध गुंतले आहेत का, तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे का, याची निष्पक्ष चौकशी झाली पाहिजे. अर्थात, कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध गैरव्यवहाराचा निष्कर्ष पुराव्याशिवाय काढता येणार नाही; मात्र तक्रारींची पारदर्शक चौकशी होणे ही काळाची गरज आहे.

शासनाने तातडीने विशेष तपासणी समिती नेमावी!

या संपूर्ण प्रकरणाची गंभीरता लक्षात घेता राज्य शासनाने तातडीने विशेष तपासणी समिती नेमावी, अशी मागणी होत आहे. या समितीने पुढील बाबींची चौकशी करावी :

१. नागपूर, भंडारा, गोंदिया, वर्धा, चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांतील संशयित वजनकाट्यांची अचानक तपासणी करावी.

२. रिमोट कंट्रोल किट, इलेक्ट्रॉनिक सर्किट आणि सॉफ्टवेअरच्या माध्यमातून वजनामध्ये फेरफार केला जातो का, याची तांत्रिक तपासणी करावी.

३. संबंधित उत्पादक आणि विक्रेत्यांच्या पुरवठा साखळीची चौकशी करून बेकायदेशीर किटचा पुरवठा करणाऱ्यांवर कारवाई करावी.

४. शेतकऱ्यांच्या धान्य, कापूस, भाजीपाला आणि स्क्रॅप खरेदी-विक्री व्यवहारांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वजनकाट्यांची विशेष मोहीम राबवावी.

५. वापूर्वी प्राप्त झालेल्या सर्व तक्रारी, व्हिडिओ आणि पुराव्यांची पुनर्तपासणी करावी.

6. दोषी आढळणाऱ्या व्यापारी, उत्पादक आणि विक्रेत्यांवर वैधमापनशास्त्र कायदा व लागू फौजदारी कायद्यानुसार कठोर कारवाई करावी.

७. संबंधित अधिकाऱ्यांनी कर्तव्यात कसूर केली असल्यास त्यांचीही जबाबदारी निश्चित करावी.

शेतकऱ्यांच्या घामाची किंमत वाचविण्याची जबाबदारी शासनाची!

वजनकाट्यातील रिमोट किट किंवा इलेक्ट्रॉनिक सेटिंगच्या माध्यमातून होणारी फसवणूक ही केवळ तांत्रिक अनियमितता नसून ती शेतकऱ्यांच्या आणि ग्राहकांच्या आर्थिक हक्कांवर होणारी गदा आहे. अशा प्रकारांना वेळीच आळा घातला नाही, तर प्रामाणिक व्यापाऱ्यांचाही व्यवसाय धोक्यात येईल आणि ग्राहकांचा वजनमाप व्यवस्थेवरील विश्वास उडेल.

शासनाने या प्रकरणाकडे केवळ तक्रार म्हणून न पाहता शेतकरी आणि ग्राहकांच्या आर्थिक संरक्षणाचा गंभीर प्रश्न म्हणून पाहावे. दोषींना कोणतेही राजकीय किंवा प्रशासकीय संरक्षण न देता निष्पक्ष चौकशी करून कठोर कारवाई करावी, हीच जनतेची अपेक्षा आहे.

संपादकीय लेखणीतून...

महागाई एके महागाई

गगनभेदी महागाईने सर्वसामान्यांच्या घरखर्चाचे गणित पूर्णपणे बिघडले आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांपासून ते मध्यमवर्गीय कुटुंबांपर्यंत सर्वच जण महागाईत होरपळत आहे. साऱ्यांच्या ओठी महँगाई मार गयी हेच शब्द आहेत. उत्पन्नाच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वेगाने वाढत असल्याने नागरिकांची क्रयशक्ती कमी होत असून भविष्याशी बचत करणे कठीण झाले आहे. गुरूवारी जाहीर झालेल्या अधिकृत आकडेवारीनुसार ऑक्टोबरमध्ये देशातील किरकोळ महागाईचा दर ६.०९ टक्क्यांवर पोहोचला. गत २ वर्षातील हा सर्वाधिक दर असून रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेल्या ६ टक्क्यांच्या कमाल सहनशीलतेच्या मर्यादेलाही महागाईने ओलांडले आहे. अन्नधान्य महागाईचा दर ८.९४ टक्क्यांवर गेल्याने सर्वसामान्य कुटुंबावरील आर्थिक ताण वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर पुढील महिन्यात रिझर्व्ह बँकेकडून व्याज दरवाढ केली जाण्याची शक्यता व्यक्त होत आहे. साँख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्राथमिक आकडेवारीनुसार सप्टेंबरमध्ये किरकोळ महागाईचा दर ५.५४ टक्के होता तो ऑक्टोबरमध्ये वाढून ६.०९ टक्क्यांवर पोहोचला. अन्नधान्य महागाईचा दर सप्टेंबरमधील ७.७४ टक्क्यांवरून ८.९४ टक्क्यांवर गेला. उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसताना वस्तूंच्या किमती वाढत असल्याने नागरिकांना कमी वस्तू खरेदी करणे, आवश्यक खर्च पुढे ढकलणे किंवा बचतीचा पैसा खर्च करणे भाग पडू शकते. राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचा विचार केल्यास पुडुचेरीमध्ये सर्वाधिक ७.९६ टक्के, मिझोरममध्ये सर्वात कमी २.८५ टक्के किरकोळ महागाई आहे. महाराष्ट्रात हा दर ५.८५ टक्के, केरळमध्ये ६.२२ टक्के तर उत्तर प्रदेशात ६.४७ टक्के नोंदवण्यात आला आहे.म्हणजे देशात विविध राज्यांमध्ये महागाईचा परिणाम वेगवेगळ्या प्रमाणात होत आहे. ५० लाखापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या राज्यांमध्ये अन्नधान्य महागाईच्या बाबतीत आंध्र प्रदेश १३.२३ टक्क्यांसह आघाडीवर आहे. त्यानंतर तामिळनाडू १२.३७ टक्के, कर्नाटक १२.१६ टक्के, तेलंगणा ११.६६ टक्के आणि केरळ १०.९२ टक्के असा क्रमांक लागतो. ग्रामीण भागातील किरकोळ महागाईचा दर ६.६३ टक्के तर शहरी भागात ५.४१ टक्के आहे. ग्रामीण भागात अन्नधान्य महागाई ९.०९ टक्के तर शहरी भागात ८.६८ टक्के नोंदवण्यात आली आहे. अन्नधान्याच्या किमती वाढल्याने गरीब कुटुंबांच्या पोषणविषयक गरजांवर परिणाम झाला आहे. निवृत्ती वेतनावर अवलंबून असलेल्या ज्येष्ठ नागरिकांनाही वाढत्या खचामुंळे आर्थिक स्वातंत्र्य टिकवणे कठीण झाले आहे. मध्यमवर्गीय कुटुंबांना मुलांचे शिक्षण, आरोग्यावरील खर्च आणि भविष्यासाठीची बचत यांचा फेरविचार करावा लागत आहे. देशाचा सरासरी महागाई दर मात्र आशा कुटुंबनिहाय आर्थिक अडचणींचे संपूर्ण चित्र स्पष्ट करत नाही. नागरिकांची क्रयशक्ती कमी झाल्यास अनावश्यक वस्तू आणि सेवांवरील खर्चात कपात होऊ शकते. त्याचा परिणाम कंपन्यांच्या उत्पन्नावर, गुंतवणुकीवर आणि शेअर बाजारातील मूल्यांकनावर होण्याची शक्यता आहे. महागाईचा दर दीर्घकाळ उच्च पातळीवर राहिल्यास कर्ज घेण्याचा खर्चही वाढू शकतो. महागाई नियंत्रणात ठेवताना आर्थिक विकासाचा वेग कायम राखण्याचे आव्हान रिझर्व्ह बँकेसमोर आहे. आरबीआयचे महागाईचे लक्ष्य ४ टक्के असून त्यासाठी २ ते ६ टक्क्यांची सहनशील मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ऑक्टोबरमधील महागाईने ही कमाल मर्यादा ओलांडली असली तरी केवळ या आकडेवारीच्या आधारे पुढील व्याज दरवाढ निश्चित मानता येणार नाही. महागाईचा सामना करण्यासाठी केवळ व्याज दरांमध्ये बदल करणे पुरेसे ठरणार नाही. कृषी उत्पादनांची साठवणूक व्यवस्था सुधारणे, वितरणाचा वेग वाढवणे, बाजारात वेळेवर हस्तक्षेप करणे आणि गरजू कुटुंबांना आर्थिक मदत देणे यासारख्या उपाययोजनाही कराव्या लागतील. विशेषत: अन्नधान्याच्या पुरवठ्यातील अडथळे दूर केल्याशिवाय ग्राहकांना दिलासा मिळणे कठीण आहे. अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढत असला तरी त्याचा लाभ सामान्य कुटुंबांच्या क्रयशक्तीत आणि आर्थिक सुरक्षिततेत कितपत प्रतिबिंबित होतो, ते महत्त्वाचे आहे. उत्पन्नाच्या तुलनेत जीवनावश्यक वस्तू परवडण्याजोग्या झाल्या पाहिजेत.



दिवाळी दिवाळीच, ईद ईदच : तुलना की सामाजिक सलोखा?

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

दिवाळीची ईदशी तुलना करणे वैचारिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या अयोग्य मानले जाते, कारण दोन्ही सणांची स्वतःची वेगळी ऐतिहासिक, धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख आहे. अलीकडेच, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिवाळीचा "आनंदाची ईद" असा उल्लेख केल्याने तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. अनेक विचारवंत, धार्मिक संघटना आणि राजकीय विश्लेषकांच्या मते दीपावलीची ईदशी तुलना करणे अयोग्य आणि दोन्ही सणांच्या स्वतंत्र ओळखीला धक्का लावणारे आहे.

दीपावली हा सनातन धर्मातील (हिंदू धर्म) अत्यंत पवित्र सण असून त्याचा संबंध प्रभू श्रीरामांच्या १४ वर्षांच्या वनवासानंतर अयोध्येत झालेल्या आगमनाशी, रावणवधाशी आणि प्रकाशाच्या विजयाशी जोडलेला आहे. तर ईद (ईद-उल-फितर) हा इस्लाम धर्मातील पवित्र महिना रमजानच्या उपवासाची (रोझे) सांगता झाल्यानंतर साजरा केला जाणारा सण आहे.

दीपावलीमध्ये धनत्रयोदशीपासून भाऊबीजेपर्यंत पूजा, दीपप्रज्वलन, लक्ष्मीपूजन यांसारखे विधी असतात. याउलट ईदमध्ये नमाज, जकात (दानधर्म) आणि विशिष्ट सामूहिक प्रार्थनांना प्राधान्य असते. प्रत्येक धर्माच्या सणाची स्वतःची एक स्वतंत्र भाषा आणि ओळख असते. एखाद्या हिंदू सणाची व्याख्या करण्यासाठी दुसऱ्या धर्माच्या सणाचा संदर्भ देणे अनावश्यक आहे.

दुसरीकडे, काही नेते आणि सामाजिक विचारवंतांच्या मते या तुलनेचा उद्देश धार्मिक तत्त्वज्ञान जोडणे नसून मानवी आनंद आणि सामाजिक सलोखा अधोरेखित करणे हा असतो 'ईद' या शब्दाचा शब्दशः अर्थ 'उत्सव' किंवा 'आनंद' असाही घेतला जातो. त्यामुळे "दिवाळी ही आनंदाचा उत्सव आहे" या अर्थाने ही तुलना केवळ सलोखा वाढवण्यासाठी केली जाते, असे समर्थकांचे म्हणणे आहे.दोन्ही सण कुटुंब, मित्र आणि समाजाला एकत्र आणतात. दोन्ही सणांमध्ये गरीबांना दान देणे, मिठाई वाटणे आणि एकमेकांना शुभेच्छा देऊन आनंद साजरा करणे हे समान हेतू असतात. भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशात सर्वच समुदायांचे सण हे देशाचा सामायिक वारसा (सांझी विरासत) मानले जातात, ज्यामुळे लोक एकमेकांच्या आनंदात सहभागी होतात. भाजपने मल्लिकार्जुन खर्गे यांनी केलेल्या वक्तव्यावर टीका केली. भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते प्रदीप भंडारी आणि गौरव भाटिया यांनी खरगे यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. भाजपच्या मते, दिवाळीसारख्या हिंदू सणाची तुलना ईदशी करणे हे काँग्रेसच्या "तुष्टीकरणाच्या राजकारणाचे" आणि हिंदू भावनांचा अनादर करण्याचे लक्षण आहे. भाजपने हा काँग्रेसचा सनातन विरोधी दृष्टिकोन असल्याचा आरोप केला आणि खरगे यांना आव्हान दिले की, ते कधी ईदला 'आनंदाची दिवाळी' म्हणण्याचे धाडस दाखवतील का? काँग्रेस नेत्यांच्या मते, भारताच्या संमिश्र संस्कृतीमध्ये सर्व धर्मांना एकत्र येऊन जाण्याच्या उद्देशाने हे वक्तव्य केले गेले होते आणि भाजप यावर केवळ राजकारण करत आहे.

थोडक्यात सांगायचे तर, जर धार्मिक, तात्त्विक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून पाहिले तर दोन्ही सणांची पार्श्वभूमी पूर्णपणे भिन्न असल्याने त्यांची परस्पर तुलना करणे योग्य ठरत नाही. मात्र, जर सामाजिक सौहार्द, मानवी आनंद आणि एकमेकांप्रति असलेल्या सद्भावनेच्या दृष्टिकोनातून पाहिले, तर अशा विधानांमागे समाजात एकोपा निर्माण करण्याचा हेतू असू शकतो.

दिवाळी दिवाळीच आहे आणि ईद ईदच आहे; मात्र दोन्ही सणांच्या माध्यमातून माणुसकी, प्रेम आणि बंधुभाव वाढत असेल, तर त्यात तुष्टीकरण नव्हे तर सामाजिक सलोखा दिसतो.खरा सामाजिक सलोखा हा एकमेकांच्या सणांचे अस्तित्व आणि त्यांची मूळ ओळख पूर्णपणे स्वीकारून त्यांचा आदर राखण्यात आहे. सणांची कृत्रिम तुलना करण्यापेक्षा, दिवाळीचे दिवे आणि ईदची शेरखुर्मा यांची गोडी या दोघांचेही भारतीय संस्कृतीतील स्थान स्वतंत्र आणि अनन्यसाधारण आहे हे मान्य करणे, हाच खऱ्या अर्थाने सामाजिक सलोखा ठरतो.

- ९५६१५९४३०६

न्यूझीलंडने टिम इंडियाच्या गुणवत्तेची लक्तरे वेशीला टांगली

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

चौथ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडने भारताचा २४४ धावांनी पराभव केला. भारताचा एकदिवसीय सामन्यातील हा दुसरा सर्वात मोठा पराभव आहे. यापूर्वीचा पराभव २००० साली शारजामध्ये श्रीलंकेविरुद्ध २४५ धावांनी झाला होता. माउंट मौंगानुई येथे संपूर्ण भारतीय संघ ८९ धावांवर सर्वबाद झाला. भारताची एकदिवसीय सामन्यातील १०० पेक्षा कमी धावसंख्या ही आठवी वेळ आहे. मॅट हेन्रीने पहिल्याच षटकात रोहित शर्मा, विराट कोहली आणि श्रेयस अय्यर यांना बाद केले. एकदिवसीय सामन्यांमध्ये खाते न उघडताच भारताने पहिल्यांदाच तीन विकेट गमावल्या. यामुळे भारताच्या नंबर पदाचे अगदी वाभाडे निघाले. संपूर्ण जगभर हसू झाले. शेजारी पाकिस्तानात तर आनंदाला उधाण आले होते.

चौथ्या एकदिवसीय सामन्यातील प्रमुख विक्रम आणि क्षण

११ वर्षांनंतर भारताचा २०० पेक्षा जास्त धावांनी पराभव

११ वर्षांनंतर भारताला २०० पेक्षा जास्त धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. संघ शेवटचा २०१५ मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध २१४ धावांनी हरला होता. दोनशे किंवा अधिक धावांनी सर्वाधिक पराभव झालेल्या संघांच्या यादीत भारत संयुक्तपणे अव्वल स्थानी. दोनशे किंवा अधिक धावांनी सर्वाधिक एकदिवसीय पराभव झालेल्या संघांच्या यादीत भारताने जिथे संघाने ९ धावांत ४ गडी गमावले होते.

रोहित आणि कोहली दुसऱ्यांदा एकदिवसीय सामन्यात शून्यावर बाद

या सामन्यात रोहित शर्मा आणि विराट कोहली दोघेही आपले खाते उघडण्यात अपयशी ठरले. एकदिवसीय सामन्यांमध्ये दुसऱ्यांदा असे घडले आहे की, दोघेही एकाच सामन्यात शून्यावर बाद झाले. यापूर्वी २०१० मध्ये श्रीलंकेविरुद्ध दंबुला येथील एकदिवसीय सामन्यात असे घडले होते.

भारताची आठवी एकदिवसीय धावसंख्या १०० च्या खाली

भारतीय संघ ८९ धावांवर सर्वबाद झाला. एकदिवसीय सामन्यांमध्ये भारताचा संघ १०० पेक्षा कमी धावांवर सर्वबाद होण्याची ही आठवी वेळ आहे. या यादीतील भारताची सर्वात कमी धावसंख्या २००० साली श्रीलंकेविरुद्ध केलेली ५४ आहे.

न्यूझीलंडने भारताविरुद्ध सहाव्यांदा ३०० पेक्षा जास्त धावा केल्या

न्यूझीलंडने ५० षटकांत ३३३ धावा केल्या. भारताविरुद्ध एकदिवसीय सामन्यांमध्ये ३०० पेक्षा जास्त धावा करण्याची ही संघाची सहावी वेळ आहे. भारताविरुद्ध त्यांची सर्वोच्च धावसंख्या १९९९ मध्ये राजकोट येथे केलेली ३४९/९ आहे. एकदिवसीय सामन्यांमध्ये सर्वबाद झाल्यानंतर न्यूझीलंडची ३३३ ही दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. या सर्दभात संघाची सर्वोच्च धावसंख्या ३३७ आहे, जी २०२३ मध्ये हैदराबाद येथे भारताविरुद्ध केली होती.

मॅट हेन्रीचा भारताविरुद्ध दुसऱ्यांदा बळींचा पंचक

मॅट हेन्रीने २७ धावांत ६ बळी घेतले. भारताविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडच्या गोलंदाजाने घेतलेली ही दुसरी ६ बळींची कामगिरी आहे. यापूर्वीची सर्वोत्तम विक्रम २००५ मध्ये बुलावायो येथे शेन बॉंडच्या नावावर होता, ज्याने १९ धावांत ६ बळी घेतले होते. हेन्रीने भारताविरुद्धच्या एकदिवसीय सामन्यात चौथ्यांदा एका डावात ४ किंवा अधिक बळी घेतले. या बाबतीत त्याने रवी रामपॉल, अजंथा मेंडिस आणि ब्रेट ली यांच्या विक्रमाची बरोबरी केली. न्यूझीलंडसाठी सर्वाधिक ५-बळी घेण्याच्या कामगिरीत हेन्री संयुक्तपणे तिसऱ्या क्रमांकावर आहे. या सामन्यात हेन्रीने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील चौथा ५-बळी घेण्याचा पराक्रम पूर्ण केला. ५-बळी घेण्याचा पराक्रम म्हणजे गोलंदाजाने एका डावात किमान पाच फलंदाजांना बाद करणे. न्यूझीलंडसाठी ट्रेंट बोल्टने सर्वाधिक वेळा, सहा वेळा, हा पराक्रम केला आहे. रिचर्ड हॅडलीने पाच वेळा ही कामगिरी केली आहे.

२०१८ पासून भारताची पॉवरप्लेमधील सहावी सर्वात कमी धावसंख्या

भारताने पहिल्या १० षटकांत चार गडी गमावले आणि २६ धावा केल्या. एकदिवसीय सामन्यांमधील पहिल्या दहा षटकांना पॉवरप्ले म्हटले जाते. २०१८ पासून एकदिवसीय सामन्यांमधील पहिल्या दहा षटकांत भारताची ही सहावी सर्वात कमी धावसंख्या आहे. या यादीतील सर्वात खराब कामगिरी २०१९ मध्ये सिडनी येथे ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन गडी गमावून २१ धावांवर होती.

झेल घेण्याच्या बाबतीत भारताची कामगिरी १२ संघांमध्ये ११ व्या क्रमांकावर

या सामन्यात भारताचे क्षेत्ररक्षणही कमकुवत होते. २०२५ च्या सुरुवातीपासून भारताची झेल घेण्याची कामगिरी ७५.१% राहिली आहे. याचा अर्थ असा की, संघाने घेतलेल्या प्रत्येक १०० झेलपैकी केवळ सुमारे ७५ झेलच घेतले गेले आहेत. या आकडेवारीनुसार, १२ पूर्ण सदस्य संघांमध्ये भारताचा क्रमांक ११ वा आहे. या कालावधीत भारतीय खेळाडूंनी एकूण ५० झेल सोडले, जे या १२ संघांमध्ये सर्वाधिक आहेत. माउंट मौंगानुई येथेही भारताने चार झेल सोडले, ज्यात विल यंगने सोडलेल्या दोन झेलचा समावेश आहे.

सामन्याला वळण देणारे तीन लक्षवेधक पाच क्षण

विल यंग ५ धावांवर असताना त्याचे दोन झेल सुटले, त्याने १२५ धावा केल्या. न्यूझीलंडच्या डावाच्या दुसऱ्या षटकात, आकीब नबीच्या गोलंदाजीवर भारताने विल यंगला सलग दोन चेंडूंवर जीवदान दिले. अकीब नबीने टाकलेल्या षटकातील पाचव्या चेंडूवर यंगच्या बॅटची बाहेरील कड लागली. चेंडू स्लिपमध्ये गेला, पण रोहित शर्माने झेल सोडला. त्याच्या पुढच्या चेंडूवर पुन्हा एकदा कड लागली. यावेळी, यष्टीरक्षक ईशान किशन झेल घेण्यासाठी उजवीकडे झेपावला, पण चेंडू त्याच्या ग्लोव्हजमधून निसटला. त्यावेळी यंग फक्त ५ धावांवर खेळत होता. विल यंगने १०८ चेंडूंमध्ये १२५ धावा केल्या. खऱ्या अर्थाने भारताने तेथेच सामना गमावला.

सेफर्टला बाद केल्यानंतर गुरनूरचा वाद

न्यूझीलंडच्या डावाच्या बाराव्या षटकात टीम सेफर्ट आणि भारतीय वेगवान गोलंदाज गुरनूर ब्रार यांच्यात वाद झाला. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर, गुरनूरने सेफर्टला यष्टीरक्षक ईशान किशनकरवी झेलबाद केले. विकेट घेतल्यानंतर, गुरनूर सेफर्टकडे गेला. दोघांमध्ये थोडी बाचाबाची झाली. विराट कोहलीने हस्तक्षेप करून गुरनूरला मागे खेचले. त्यानंतर पंच खिस ब्राऊनने भारतीय गोलंदाजाला ताकीद दिली.

न्यूझीलंडच्या डावाच्या २३ व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर, फिन एलनने अक्षर पटेलच्या गोलंदाजीवर षटकार मारला. त्याचा फटका इतका जोरदार होता की चेंडूचा आकारच बदलला. त्यानंतर चौथे पंच एका ब्रीफकेसमध्ये नवीन चेंडू घेऊन मैदानावर आले.

- ९०९६३७२०८२

कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमी भगवान सहस्त्रार्जुन महाराज जन्मोत्सव

रमेश लाजेवार
नागपूर

सहस्त्रार्जुन जन्मोत्सव कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला मोठ्या उत्साहाने साजरा केल्या जाते. सहस्त्रार्जुन क्षत्रिय चंद्रवंशीय राजा होते. सहस्त्रार्जुनचा जन्म महाराज हैह्यवंशातील १० वी पीढीतील माता पद्मिनी यांच्यापासून झाला.जन्मनाव एकवीर होते.चंद्रवंशाचे महाराज कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे त्यांना कार्तवीर्य-अर्जुन संबोधल्या जात होते.कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे कार्तवीर्यार्जुन या नावाने सुध्दा ओळखले जावु लागले. कार्तवीयार्जुन यांनी आपल्या आराधनेच्या माध्यमातून भगवान दत्तात्रेय यांना प्रसन्न केले.त्यामुळे भगवान दत्तात्रेय यांनी युध्दाच्या वेळी कार्तवीर्यार्जुन यांना हजार हाताचे बळ प्राप्त करण्याचे वरदान दिले.त्यामुळे त्यांना सहस्त्रार्जुन संबोधल्या जावु लागले. यांनाच सहस्त्रबाहु अर्जुन सुध्दा म्हणतात. सहस्त्रार्जुन (सहस्त्रबाहु) यांची कथा ग्रंथ महाभारतासह अनेक वेदांसोबतच संपूर्ण पुराणांमध्ये सुध्दा दिसून येते.भगवान विष्णु आणि माता लक्ष्मी यांच्या सोबतच सहस्त्रार्जुन यांच्या कथेचे वर्णन भागवत पुराणमध्ये पहायला मिळते. देवतांच्या अनेक अवतारप्रमाणे सहस्त्रार्जुन महाराज हे भगवान विष्णूचे २४ वे अवतार माणल्या जाते. सहस्त्रार्जुन महाराज यांच्या नावाने सुध्दा पुराण व संग्रह दिसून येते. सहस्त्रार्जुन महाराज यांच्या पुराणांचे तीन संग्रह प्रसिद्ध आहे. सहस्त्रार्जुन महाराज यांचे जन्म नाव एकवीर होते.ते कृतवीर्य यांचे पुत्र असल्यामुळे कार्तवीर्य व अर्जुन तथा सहस्त्रभुजा असल्याचा वरदान असल्यामुळे सहस्त्रार्जुन या नावाने ओळखल्या जाते. भारतातील संपुर्ण कलार, कलाल, कलवार, कलचुरी समाज सहस्त्रार्जुन महाराजांचे वंशज आहेत.त्यामुळे कलार, कलाल,कलवार,कलचुरी समाज संपूर्ण भारतासह अनेक राज्यांमध्ये सहस्त्रार्जुन महाराजांचा जन्मोत्सव कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला दिपोत्सवाप्रमाणे मोठ्या थाटाने व उत्साहाने साजरा करून पुजा-अर्चना करतात.

मध्यप्रदेशमध्ये सहस्त्रार्जुन महाराजांच्या जन्मोत्सोला सार्वजनिक सुट्टी सुध्दा असते. सहस्त्रार्जुन (सहस्त्रबाहु)हे दानी, विद्वान, महाग्याणी, महापराक्रमी, महान योध्दा आणि कर्तव्य निष्ठावान राजा होते. हैह्यवंशिय महाराज कार्तवीर्य अर्जुन (सहस्त्रार्जुन) यांची पुजा सप्तमीला दिपोत्सवा प्रमाणे साजरी केली जाते.त्याचप्रमाणे हा जन्मोत्सव इतिहास, उमंग, गुनगान आणि महाराजांची अपार महिमा याला जन्मोत्सवाच्या निमित्ताने अनेक राज्यांत व शहरात मोठ्या उत्साहाने शोभायात्रा काढुन साजरी केली जाते. दरवर्षी कार्तिक मास शुक्ल पक्ष सप्तमी या तीथीला सहस्त्रार्जुन जन्मोत्सव मोठ्या धुमधडाक्यात व थाटात साजरा करुन अनेक ठीकाणी मोठ-मोठी सजावट करून झांकीया व शोभायात्रेच्या रूपात आपल्याला पाहायला मिळते.

पौराणीक ग्रंथ व पुराणांनुसार कार्तवीर्य अर्जुन(सहस्त्रार्जुन) यांना हैह्याधिपति, दशग्रीविजयी, सुदशेन, चक्रावतार सप्तद्रवोपाधि, कृतवीर्यनंदन, राजेश्वर इत्यादी अनेक नाव असल्याचे पुराणांमध्ये वर्णन आहे. सहस्त्रार्जुन यांनी आपल्या जिवनात अनेक युद्ध लढलेत. परंतु वात रावणासोबतचे युद्ध महाकाय युद्ध मानल्या जाते.भार्गव प्रमुख जमदग्नि ऋषि (परशुराम यांचे वडील) यांच्या सोबत कृतवीर्य यांच्यासोबत चांगले संबंध होते. भागवत पुराणांमध्ये सहस्त्रार्जुन महाराज यांची उत्पत्ती व जन्म कथेचे वर्णन पहायला मिळते. सहस्त्रार्जुन यांनी भगवान विष्णूची कठोर तपश्चर्या करून १० वरदान प्राप्त केले व चक्रवर्ती सम्राट ही उपाधी धारण केली. नर्मदा नदीच्या काठावर सहस्त्रार्जुन व लंकापती रावण यांच्यात घनघोर महाकाय युद्ध झाले. रावण जेव्हा सहस्त्रार्जुन सोबत युद्ध करायला पोहचले तेव्हा सहस्त्रार्जुन आपल्या हजार हातांच्या बळावर नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहाला रोखले.नंतर



नर्मदा नदीचे पाणी एकत्र करून पाणी सोडले, ज्यामध्ये रावणासह संपूर्ण सेना नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहामध्ये वाहून गेली.या पराजयानंतर रावण आगबबुला झाला व सहस्त्राजुनला युद्धासाठी पुन्हा ललकारले व रावण आणि सहस्त्रार्जुन यांच्यात पुन्हा घनघोर युद्ध झाले.

या युद्धात रावणाचा पराजय झाला व रावणाला बंदी करण्यात आले. नंतर रावणाचे वडील महर्षि पुलत्स्य यांच्या मध्यस्थिने रावणाला सोडण्यात आले.रावण हे बालि,बलि आणि सहस्त्रार्जुन यांच्याशी युद्ध हारले.रावण जेव्हा बालि सोबत युद्ध करायला गेला तेव्हा बालि पुजा करीत होते.परंतु वारंवार बालिला युध्दासोबत ललकारल्याने बालि आगबबुला झाले अशा परिस्थितीत बालिने रावणाला आपल्या बाजुमध्ये दाबुन चार समुद्राची परीक्रमा केली. कारण बालि शक्तीशाली होते अशाप्रकारे रावणाची अनेकदा हार झाली. याच प्रकारे पाताळ लोकांचे राजा दैत्यराज बलि होते.रावण हे राजा बलि यांच्याशी युद्ध करण्यासाठी पाताळलोकात त्यांच्या महालात पोहचले व बलिला युद्धासाठी ललकारले अशा परिस्थितीत बलिच्या महालात खेळत असलेल्या मुलांनी रावणाला पकडून घोड्यांच्या तबेल्यात बांधून ठेवले.

अशाप्रकारे याही ठिकाणी रावणाची हार झाली होती. अशाप्रकारे बालि,बलि आणि सहस्त्रार्जुन यांच्या रावणाला पराजय पत्करावा लागला. शेवटी प्रभु श्रीराममचंद्रने रावणाचा वध केला. सहस्त्रार्जुन यांचा समाजासाठी त्याग दानशूरपणा लौकिक आहे. सहस्त्रबाहु (सहस्त्रार्जुन) महाराजांना जन्मोत्सवानिमित्त कोटी कोटी नमन! सहस्त्रार्जुन महाराजांच्या जन्मोत्साचे (सप्तमी) औचित्य साधुन भाविकांनी, समाजबांधवांनी देशातील बदलते हवामान लक्षात घेता मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरणाला वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.कारण आपण लावलेल्या प्रत्येक वृक्षाच्या पाण्यात, फुलात, फळात, जळा-मुळात भगवान सहस्त्रार्जुन महाराजांचे दर्शन अवश्य होईल व संपूर्ण सृष्टीमध्ये हिरवीगार गालीचा निर्माण होईल आणि संपूर्ण भारतवर्षात सहस्त्रार्जुन महाराजांचा जयजयकार सर्वत्र दिसून येईल.

- ९९२१६९०७७९

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

पवनदीप राजन-चेतना भारद्वाज यांच्या मैफिलीने रसिक प्रेक्षक मंत्रमुग्ध

सुरेल स्वरांनी रंगली संगीत संध्या, मनपाच्या गरोबा महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद





दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

सुरेल आवाज, लोकप्रिय गीतांची बहार, संगीतप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि हजारो रसिकांनी दिलेली टाळ्यांची दाद...! अशा भारलेल्या वातावरणात नागपूर महानगरपालिकेच्या गरोबा महोत्सवांतर्गत आयोजित संगीत संध्या शनिवारी (ता.१४) लकडगंज येथील सरदार वल्लभभाई पटेल कच्छीविसा मैदानात दिमाखात संपन्न झाली. इंडियन आयडल फेम सुप्रसिद्ध गायक पवनदीप राजन आणि गायिका चेतना भारद्वाज यांच्या जादुई आवाजाने संपूर्ण परिसर सुरेल स्वरांनी न्हाऊन निघाले.

कार्यक्रमाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, आमदार राजीव पोतदार, आमदार संजय भेंडे, आमदार कृष्णा खोपडे, कार्यक्रमाचे संयोजक तथा सत्तापक्ष नेत नरेंद्र (बाल्या) बोरकर, माजी महापौर दयाशंकर तिवारी, उपमहापौर लीला हाथीबेड, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लड्ढा, झोन सभापती तारा यादव, धनश्री देशपांडे, महेश्वरी बिसेन यांच्यासह स्थानिक नगरसेवक बालू रारोकर, नगरसेविका अर्चना पडोळे, नगरसेवक अतुल कोटेचा, कर आकारणी समिती सभापती सरिता कावरे, झोन समिती सभापती ज्योती देवधरे, उमा देशमुख, सीमा होमणे, अभिरुची राजगिरे, नगरसेविका वैशाली उदापूरकर, अर्चना पडोळे, शारदा बारई, श्रीमती शीतल रारोकर, नगरसेवक सर्वश्री. राजेश्वर दिवटे, सुनील हिरणवार, संजय अवचट, दीपक वाडीभस्मे यांच्यासह इतर नगरसेवक मनपाचे उपायुक्त मंगेश खवले, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी, क्रीडा अधिकारी डॉ. पीयूष आंबुलकर, कार्यकारी अभियंता सुनील गजभिये यांच्यासह मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

वायेळी मार्गदर्शन करताना आमदार राजीव पोतदार यांनी संगीत संध्या कार्यक्रमांच्या आयोजनामुळे नागरिकांच्या मनात चेतना उत्साह निर्माण होत असल्याचे सांगितले. तसेच महानगरपालिका नागरिकांना नागरी सुविधा उत्तमरीत्या पुरवित असल्याचे सांगत त्यांनी मनपाच्या कार्याचे कौतुक केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाचे संयोजक तथा सत्तापक्ष नेते नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी केले. त्यांनी आपण गत वीस वर्षापासून नागरिकांकडून मिळालेल्या बळाच्या जोरावर उत्तम काम करीत असल्याचे सांगितले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते गायक पवनदीप राजन आणि गायिका चेतना भारद्वाज यांचे स्वागत केले.

गुलाबी थंडीत सायंकाळचे वातावरण संगीताच्या सुरांनी भारून गेले. कार्यक्रमाची सुरुवात चेतना भारद्वाज यांच्या जादुई आवाजाने झाली. मैं कमली, कमली... हे लोकप्रिय गीत सादर करताच संपूर्ण मैदान सुरेल वातावरणाने भारून गेले. त्यानंतर तू मेरे जानिया..., मैं तेनू समझावां... आणि सैयारा... तू पास है जैसे... यांसारख्या गीतांच्या सादरीकरणाने रसिक मंत्रमुग्ध झाले.

चेतना यांच्या भावस्पर्शी आणि मधुर आवाजाने कार्यक्रमाला एक वेगळीच उंची मिळाली. लग जा गले... हे अजरामर गीत सुरू होताच उपस्थित रसिकांनीही स्वरात स्वर मिसळला. त्यानंतर ह्यावे दिल तुम बिन लगता नहीं...ह्ह या गीताच्या सादरीकरणावेळी एक अनोखा नजारा पाहायला मिळाला. हजारो रसिकांनी आपल्या मोबाईलची टॉर्च सुरू करताच संपूर्ण मैदान प्रकाशाच्या असंख्य झगमगत्या किरणांनी उजळून निघाले. क्षणभर संपूर्ण परिसर एखाद्या तारकांनी भरलेल्या आकाशासारखा भासत होता.

त्यानंतर पवनदीप राजन यांच्या दमदार आणि वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने संगीत संध्येची रंगत आणखी वाढली. जो तुम ना हो..., कैसे हुआ... तू इतना जरूरी कैसे हुआ... यांसारखी लोकप्रिय गीते सादर करत त्यांनी रसिकांची मने जिंकली. त्यांच्या प्रत्येक गीताला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात उत्स्फूर्त दाद दिली.

मात्र, कार्यक्रमातील सर्वाधिक आकर्षण ठरले ते लोकप्रिय मराठी गीत सैराट झालं जी.... हे गीत सादर होताच संपूर्ण मैदानात एकच जल्लोष झाला. टाळ्यांचा प्रचंड कडकडाट आणि रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे वातावरण अक्षरशः भारून गेले. अनेक रसिकांनी गीताच्या ठेक्यावर ताल धरत कलाकारांना भरभरून दाद दिली. आज मौसम बड़ा बेईमान है... या गीतानेही रसिकांच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. एकामागोमाग एक लोकप्रिय आणि भावस्पर्शी गीतांची बहार सुरू असताना कलाकार आणि रसिक यांच्यातील सुरेल संवाद अधिकाधिक रंगत गेला. पवनदीप राजन यांनी गीत गायले तसेच तबला आणि गिटार, पियानो वरील सुर छेडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर जे आमोद यांनी केले.

बँड प्रलयचे उत्तम सादरीकरण

मुख्य कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी नागपूरकर युवकांचा "प्रलय बँड" ने त्यांच्या सादरीकरणातून उपस्थित यांचे मनोरंजन केले. त्यांनी उत्तम गाणी सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गायिका हर्षदा हिने गायिलेल्या गाण्यांच्या सुरांनी संपूर्ण वातावरण संगीतमय केले.

थोडक्यात

चांदा फोर्ट रेल्वे स्थानक सुरक्षेच्या प्रतीक्षेत : आरपीएफ चौकीसाठी अजय दुबे आक्रमक



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर :-(धनंजय पांढरे)

चांदा फोर्ट रेल्वे स्थानकावरील अपुऱ्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, येथे स्वतंत्र रेल्वे सुरक्षा बलाची (आरपीएफ) चौकी स्थापन करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. यासंदर्भात झेडआरयूसीसी सदस्य अजय दुबे यांनी शुक्रवार १३ नोव्हेंबर रोजी माजी मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. चांदा फोर्ट रेल्वे स्थानकावर दररोज १० प्रवासी गाड्या आणि २५ मालगाड्यांची वर्दळ असते. सुमारे ७०० प्रवासी या स्थानकावरून प्रवास करतात. एवढी मोठी रेल्वे वाहतूक आणि प्रवाशांची संख्या असतानाही येथे आरपीएफची स्वतंत्र चौकी नाही. या स्थानकाची सुरक्षा सुमारे १०० किलोमीटर दूर असलेल्या नागभीड येथील आरपीएफ चौकीच्या अखत्यारीत येते. विशेष म्हणजे, नागभीड चौकीतील केवळ १६ जवानांवर तब्बल २९० किलोमीटर रेल्वे क्षेत्राच्या सुरक्षेची जबाबदारी आहे.

चांदा फोर्ट स्थानकावर प्रत्यक्षात केवळ दोन आरपीएफ जवानांच्या माध्यमातून प्रवासी आणि रेल्वे मालमत्तेची सुरक्षा केली जात आहे. त्यामुळे संभाव्य चोरी, गुन्हेगारी आणि अनुचित घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी स्वतंत्र चौकीची आवश्यकता असल्याचे दुबे यांनी निवेदनात स्पष्ट केले.या मागणीची दखल घेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सकारात्मक भूमिका दर्शविली असून, आगामी दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या बैठकीत हा विषय उपस्थित करून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले आहे. चांदा फोर्ट येथे आरपीएफ चौकी स्थापन झाल्यास रेल्वे प्रवाशांना अधिक सुरक्षित वातावरण मिळण्यासोबतच रेल्वे मालमत्तेच्या संरक्षणालाही बळ मिळणार आहे.

पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना गहू पिकासाठी पाणी देण्याचे नियोजन करा!

पाणी देणार नसल्याचे पत्र मागे घ्या; अन्यथा २५० कोटी रुपयांची नुकसानभरपाई द्या : माजी जि.प. सदस्य देवेंद्र गोडबोले यांची मागणी

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा

पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांसमोर रब्बी हंगामातील गहू पिकाच्या सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पेंच प्रकल्प प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेऊन लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना गहू पिकासाठी पाणी उपलब्ध करून देण्याचे तातडीने नियोजन करावे, अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य देवेंद्र गोडबोले यांनी केली आहे. पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सुमारे ३ लाख एकर शेतीला सिंचनाचे पाणी उपलब्ध न झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. गहू पिकाला योग्य वेळी पाणी मिळाले नाही, तर संपूर्ण रब्बी हंगाम धोक्यात येण्याची शक्यता आहे. पेंच प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांनी गहू पिकासाठी पाणी देणार नसल्याबाबत काढलेले पत्र तातडीने मागे घ्यावे. तसेच लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांना गहू पिकासाठी आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्याचे नियोजन करून पाणी सोडण्याचे वेळापत्रक जाहीर करावे.

जर प्रशासनाने पाणी उपलब्ध करून दिले नाही, तर सुमारे ३ लाख एकर शेतीतील पिकांचे नुकसान होण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांना किमान २५० कोटी रुपयांची नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारावी. शेतकऱ्यांचा तोंडचा घास हिरावून घेण्याचा अधिकार कोणालाही नाही. पाणी उपलब्ध करून देणे शक्य असताना शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवू नये.

शेतकऱ्यांना गहू पिकासाठी पाणी द्या, पाणी नाकारण्याचे पत्र मागे घ्या; अन्यथा २५० कोटी रुपयांची नुकसानभरपाई द्या!



अन्यथा पेंच प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील सर्व शेतकरी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करतील. या आंदोलनातून उद्भवणाऱ्या परिस्थितीला संपूर्णपणे शासन आणि प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही माजी जिल्हा परिषद सदस्य देवेंद्र गोडबोले यांच्यासह लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी दिला आहे.

- देवेंद्र गोडबोले, माजी जिल्हा परिषद सदस्य, मौदा

पिटक फाऊंडेशनतर्फे रुग्णालयातील चिमुकल्यांसोबत बालदिन साजरा

कॅन्सर व जनरल वॉर्डमधील ३० बालरुग्णांना भेटवस्तूंचे वाटप; चित्रकला उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

बालदिनानिमित्त पिटक फाऊंडेशन, नागपूरच्या वतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेडिकल), नागपूर येथे उपचार घेत असलेल्या चिमुकल्यांसोबत बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कॅन्सर विभाग व जनरल वॉर्डमधील सुमारे ३० बालरुग्णांना आकर्षक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले. या उपक्रमात मुलांसाठी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी रंगांच्या माध्यमातून आपल्या कल्पनाशक्तीला अभिव्यक्ती देत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भेटवस्तू आणि चित्रकला उपक्रमामुळे बालरुग्णांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले.

उपचार घेत असलेल्या बालकांना मानसिक आधार, प्रेम आणि आनंदाचे क्षण मिळावेत, या उद्देशाने फाऊंडेशनतर्फे हा उपक्रम राबविण्यात आला. या आयोजनासाठी मेडिकल रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका व वैद्यकीय कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

जयंती निमित्त वस्ताद लहुजी साळवे यांना अभिवादन, भोजनदानाचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, वाडी

वस्ताद लहुजी साळवे अंबाझरी उद्यान येथे भारताचे आद्य क्रांतिगुरूवस्ताद लहुजी साळवे यांची २३२वी जयंती स्मारक ट्रस्ट तर्फे मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष विनायक इंगोले, उदघाटक लहानू इंगळे,मुख्य अतिथी राज्य कर उपायुक्त प्रदीप बोरकर,मुख्य वक्ते साहित्यिक चंद्रकांत वानखेडे यांच्या हस्ते लहुजींच्या पुतळ्याला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमा दरम्यान आमदार विकास ठाकरे,माजी महापौर दयाशंकर तिवारी, नगरसेविका सुनीता तभाने यांनी लहुजींना अभिवादन करून शुभेच्छा दिल्या.यावेळी मंचकावर ट्रस्ट चे संस्थापक राजेश खंदारे, विचारवंत अरविंद डोंगरे,नगरसेवक योगेश पाचपोर, बुधाजी सुरकार, समाजसेवक गुरुदास बावणे,किशोर बेहाडे, महादेव जाधव, रवी वानखेडे प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी प्रसिध्द गायक सुरेंद्र डोंगरे यांचा सुगम संगीताचा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाचे संचालन सचिव शिवशंकर ताकतोडे यांनी तर आभार गणेश साळवे यांनी केले. उपस्थित शेकडो समाज बांधवांना भोजनदान करण्यात आले.

वाकेश्वर येथे नातेवाईकाच्या मयतीसाठी आलेल्या महिलेला मेटाडोरने चिरडले

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मोदा

आज शनिवार (ता.१४ नोव्हेंबर)ला दुपारी तीन वाजता दरम्यान भंडारा येथून अरोली कडे जाणाऱ्या रामटेक- भंडारा या महामार्गावर स्थित वाकेश्वर फाटा येथील बस स्थानकात भंडारा येथे जाण्यासाठी उभ्या असलेल्या रंजू चावके (४५) या विधवा महिलेला चिरडल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तिच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी विवाहित असून एक मुलगी अविवाहित आहे, असे वाकेश्वर येथील नागरिकांनी सांगितले. दिवाळीच्या पांडव पंचमीच्या दिवशी घडलेल्या घटनेने चावके परिवारावर दुखाचा डोंगर कोसळला असल्याने वाकेश्वर परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, वाकेश्वर टोली येथील



गृहस्थ दसाराम गुडेवार(८३) यांच्या वृद्धापकाळाने निधन झाल्याने मयतीच्या कार्यक्रमासाठी त्यांची तुमसर येथील नातेवाईक रंजू चावके आली होती. मयतीच्या कार्यक्रम आटोपल्यानंतर भंडाऱ्यावरून तुमसरला एसटी महामंडळाच्या बसने जाण्यासाठी आज शनिवार दुपारी तीनच्या दरम्यान वाकेश्वर फाटा येथील बस स्थानकात उभी होती.

त्यादरम्यान अरोली येथील भाजीपाला व्यावसायिक अविवाहित युवक अमोल पानतावणे (२३) भंडाऱ्यावरून अरोलीकडे तर इंजनी येथील दोन युवक त्यांच्या दुचाकीने इंजनी वरून वाकेश्वरला आले व अरोलीकडे जाण्यासाठी वळले असता एका युवकाची दुचाकी मेटॅडोरच्या मरगडमध्ये फसल्याने मेटाडोर चालकाच्या स्टेरिंग हँग झाला. त्यामुळे चालक पानतावणे याच्या मोटाडोर वरील नियंत्रण सुटल्याने मेटाडोरने तेथे उभे असलेल्या महिला चिरडत नेले असे तेथे उपस्थितांनी सांगितले व तसा घटनेच्या व्हिडिओ समाज माध्यमांवर वायरल करण्यात आला.

अरोली पोलिसांच्या ताफा घटनास्थळी लगेच दाखल झाला व घटनास्थळी मृत्यू पावलेल्या महिलेला त्यांनी रामटेक येथे शवविच्छेदनासाठी नेले असून आरोपी चालक अमोल पाणतावणे याला अटक केलेली आहे. याबाबत अरोली थानेदार सागर गोमासे यांना सायं.७:४५ वाजता सदर घटनेबाबत विचारपूस करण्यासाठी भ्रमणध्वनी केले असता त्यांनी एफआयआर ची प्रक्रिया सुरू असून अर्ध्या तासात पूर्ण झाली की मी तुम्हाला कळवितो असे सांगितले. मात्र रात्री नऊच्या दरम्यान बातमी लिहीपर्यंत त्यांच्याकडून माहिती मिळालेली नाही.

महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेचा ऐतिहासिक विजय!

आंदोलन, मोर्चा किंवा संप न करता सातत्यपूर्ण पाठपुराव्याने बेसा- पिंपळा येथील घंटागाडी व सफाई कामगारांना तीन वर्षांचा प्रलंबित बोनस मिळवून दिला

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नगर पंचायत बेसा-पिंपळा अंतर्गत सिटीपिटी कंपनी आणि फीडबॅक फाउंडेशनच्या माध्यमातून कार्यरत असलेल्या घंटागाडी व सफाई कामगारांना मागील तीन वर्षांपासून बोनस मिळत नव्हता. त्यामुळे कामगारांमध्ये नाराजीचे वातावरण होते. कामगारांच्या या गंभीर प्रश्नाची दखल घेत महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेने पुढाकार घेतला आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या माध्यमातून अखेर कामगारांना त्यांचा कायदेशीर हक्क मिळवून देण्यात यश मिळविले. संघटनेच्या या यशस्वी कामगिरीमुळे कामगार वर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, संघटनेच्या या विजयाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

नगर पंचायत बेसा-पिंपळा क्षेत्रात स्वच्छता आणि घनकचरा व्यवस्थापनाची महत्त्वपूर्ण जबाबदारी घंटागाडी चालक, कर्मचारी तसेच सफाई कामगार पार पाडत आहेत. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या या कामगारांना मात्र मागील तीन वर्षांपासून नियमानुसार मिळणारा बोनस मिळत नव्हता. कामगारांच्या मेहनतीचा योग्य मोबदला आणि कायदेशीर लाभ मिळणे आवश्यक असताना हा प्रश्न प्रलंबित असल्याने महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेने याबाबत लक्ष घातले.

संघटनेचे विदर्भ सरचिटणीस रॉकी महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर शहर अध्यक्ष अजय तांडेकर यांनी संबंधित यंत्रणेकडे या विषयाचा सातत्याने पाठपुरावा केला. कामगारांच्या बोनससंदर्भातील नियम, त्यांचा कायदेशीर



अधिकार आणि प्रलंबित देयकांचा विषय संबंधित कंपनी व यंत्रणेसमोर प्रभावीपणे मांडण्यात आला.

चर्चेच्या माध्यमातून कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेने नियोजनबद्ध प्रयत्न केले. या प्रयत्नांना अखेर यश आले असून, सर्व संबंधित कामगारांचा नियमानुसार ८.३३ टक्के बोनसचा हिशोब करून त्यांना पूर्ण पगारी बोनस देण्यात आला आहे. मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न मार्गी लागल्याने कामगारांना मोठा दिलासा मिळाला आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रक्रियेत संघटनेने कोणतेही आंदोलन, मोर्चा अथवा संपाचे हत्यार न उचलता केवळ संवाद, चर्चा आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा या मार्गाने हा प्रश्न यशस्वीरीत्या सोडविला. कामगारांच्या हक्कांसाठी संघर्ष करणे म्हणजे केवळ रस्त्यावर उतरून आंदोलन करणे नव्हे, तर योग्य नियोजन, प्रभावी संवाद आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या माध्यमातूनही कामगारांना न्याय मिळवून देता येतो, हे महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेने या यशातून दाखवून दिले आहे. कामगारांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना सदैव कटिबद्ध असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे.

या यशस्वी प्रयत्नांमध्ये विदर्भ सरचिटणीस रॉकी महाजन, नागपूर शहर अध्यक्ष अजय तांडेकर यांच्यासह संघटनेचे कार्यकर्ते व सदस्य विजय तांडेकर, निशांत कडू, सूरज बेलेकर, शैलेश गेडाम, शुभम ओहेकर, गुड्डू आर्दोनी महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला.

कामगारांच्या एकजुटीला यश, सातत्यपूर्ण पाठपुराव्याला विजय आणि त्यांच्या कष्टाचा योग्य सन्मान मिळवून देण्याच्या दिशेने महाराष्ट्र समर्थ कामगार संघटनेने टाकलेले हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. या यशामुळे बेसा- पिंपळा येथील घंटागाडी व सफाई कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण असून, संघटनेच्या कार्याचे कामगारांकडून कौतुक केले जात आहे.

थोडक्यात

जवाहर विद्यार्थी गृहात पंडित जवाहरलाल नेहरू जयंती व बालदिन उत्साहात साजरा

विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत चाचा नेहरूंना अभिवादन; बालदिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारताचे पहिले पंतप्रधान व स्वतंत्र भारताच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती आणि बालदिन जवाहर विद्यार्थी गृह, नागपूर येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांना लहान मुलांविषयी विशेष प्रेम होते. त्यामुळे त्यांची जयंती देशभरात बालदिन म्हणून साजरी केली जाते. या निमित्ताने जवाहर विद्यार्थी गृहाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष नरेंद्र दिवटे यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. यावेळी संस्थेचे मुख्यकार्यवाह हर्षवर्धन बेले, रमेश पिसे, लोकनाथ भुरे, महेश झोरे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, कर्मचारीवृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बालदिन हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्याबरोबरच त्यांच्या उज्ज्वल भवितव्याची जाणीव करून देणारा दिवस आहे. मुलांमध्ये शिक्षण, संस्कार, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविणे आवश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमाच्या निमित्ताने देण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाच्या माध्यमातून पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांचे स्मरण करून विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणा देण्यात आली.

मनपातर्फे पंडित जवाहरलाल नेहरू, क्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे यांना विनम्र अभिवादन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिकेतर्फे देशाचे प्रथम पंतप्रधान, भारतरत्न पंडित जवाहरलाल नेहरू आणि क्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. मनपाच्या उपमहापौर श्रीमती लिला हाथीबेड यांनी मनपाच्या मुख्यालयातील प्रशासकीय इमारतीमध्ये भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्ताने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहिली. यावेळी जनसंपर्क विभागाचे अमोल तपासे यांच्या सह इतर कर्मचारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे लकडगंज झोन अंतर्गत पंडित नेहरु यांच्या पूणाकृती पुतळ्याला व धरमपेठ झोन अंतर्गत येणाऱ्या अंबाझरी उद्यान येथील क्रांतीगुरु वस्ताद लहुजी साळवे यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला देखील पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

हिवरा बाजारच्या दिवाळी मंडईत सायली पाटील पुणेकर यांच्या लावणीने रंगत!

खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या हस्ते उद्घाटन; राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची उपस्थिती



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील हिवरा बाजार येथे मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित भव्य मंडईला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मंडईचे मुख्य आकर्षण ठरलेल्या प्रसिद्ध लावणी कलावंत सायली पाटील पुणेकर यांच्या बहारदार लावणी कार्यक्रमाला हजारो रसिकांनी उपस्थिती लावली. कार्यक्रमाचे उद्घाटन रामटेक लोकसभा क्षेत्राचे खासदार श्यामकुमार बर्वे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाला हिवरा बाजारच्या सरपंच रक्कला राजेश जयस्वाल, रामटेक पंचायत समितीचे माजी सभापती नरेंद्र बंधाटे,माजी सभापती संजय नेवारे,माजी सभापती चंद्रकात कोडवते,माजी जि.प.सभापती महेश बमनोटे,माजी जि.प.सदस्य कैलास राऊत आणि माजी सरपंच राजेश जयस्वाल,उपसरपंच यमुनाबाई बलदेव लाडे, ग्रामपंचायत सदस्य बाळू सलमाते, गजानन कुंभलकर, इंद्रजीत बागडे,विवेक तुरक यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रात्री ९ वाजता सुरू झालेल्या कार्यक्रमात सायली पाटील पुणेकर यांनी आपल्या बहारदार लावणी सादरीकरणाने रसिकांची मने जिंकली. प्रत्येक सादरीकरणाला प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली. परिसरातील विविध गावांमधूनही मोठ्या संख्येने नागरिक दाखल झाले होते. गर्दी लक्षात घेता मित्रपरिवार आणि पोलीस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच राजेश जयस्वाल यांनी केले. योग्य नियोजनामुळे दिवाळी मंडई उत्साहात आणि शांततेत पार पडली.

आतिश टेभूर्णे यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

इंदोरा आनंद रोड निवासी आतिश प्रेमदास टेभूर्णे, वय ५३ वर्ष, यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांची अंतयात्रा रविवार १५ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजता त्यांचा निवासस्थान येथून निघून वैशाली निर्वाण घाट येथे नेण्यात येईल. त्यांच्या मागे आई,पत्नी, एक मुलगा, एक मुलगी आदी आप्त परिवार आहे.

अशोक सिंघल रामजन्मभूमी आंदोलनाला दिशा दिली : मुख्यमंत्री



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विविध पंथ, संप्रदाय, विचारधारा आणि उपासना पद्धती वेगवेगळ्या असतानाही संपूर्ण समाजात एकतेची भावना निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण योगदान अशोक सिंघल त्यांनी दिले आहे. रामजन्मभूमी आंदोलनाला दिशा देण्यापासून ते अयोध्येत प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर साकार होण्यापर्यंतच्या प्रवासात अशोक सिंघल यांचे नेतृत्व आणि संघर्ष महत्त्वपूर्ण ठरले, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भेंडे लेआउट येथे पूज्य दीदी माँ साध्वी ऋतंभरा देवी यांच्या श्रीरामकथेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. स्व. अशोक सिंघल यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, रामजन्मभूमी आंदोलनाच्या माध्यमातून अशोक सिंघल यांनी संपूर्ण भारतात राम मंदिरनिर्मितीची अलख जागवली. त्यांच्या नेतृत्वामुळे लाखो लोकांच्या मनात एक नवी ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण झाली. १९८४ मध्ये आयोजित धर्मसंसदेत विविध संप्रदायांतील संत आणि धर्माचार्यांना एका व्यासपीठावर आणून रामजन्मभूमीवर प्रभू श्रीरामाचे मंदिर उभारण्याचा संकल्प मांडण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

समाजात अनेक पंथ, विचार, मते आणि उपासना पद्धती असू शकतात; मात्र समाजात भेदभाव असता कामा नये, एकतेची भावना कायम राहिली पाहिजे, हा विचार अशोक सिंघल यांनी मांडला. विविध धर्माचार्यांना एका व्यासपीठावर आणणे हे मोठे आव्हान होते. मात्र, त्यांनी आपल्या नेतृत्वातून हे शक्य करून दाखवले. रामजन्मभूमी आंदोलनाला संघटित स्वरूप आणि निश्चित दिशा देण्याचे काम त्यांनी केले. राम मंदिर आंदोलनात सहभागी होण्याचे तसेच अशोक सिंघल आणि दीदी माँ यांना प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य आपल्याला लाभले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आज अयोध्येत प्रभू श्रीरामाचे मंदिर साकार झाले आहे. या ऐतिहासिक प्रवासात अशोक सिंघल यांचे योगदान सदैव स्मरणात राहील, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही अशोक सिंघल यांच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या संकल्प आणि संघर्षामुळेच आज राम मंदिर निर्माणाचे स्वप्न साकार झाल्याचे त्यांनी सांगितले. रामजन्मभूमी आंदोलनाच्या काळात देशभरात जनजागृती निर्माण करण्यात अशोक सिंघल यांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करत त्यांनी अशोक सिंघल यांच्या स्मृतींना अभिवादन केले आणि दीदी माँ यांना वंदन केले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने पूज्य दीदी माँ साध्वी ऋतंभरा यांच्या आश्रमासाठी सहयोग राशी प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवरांनी श्रीरामकथेचा लाभ घेतला.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संपाचा एल्गार!

समान काम, समान वेतन, यावर शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे ! लक्ष्मीकांत साखळकर, ३४ हजार कर्मचारी आंदोलनात सहभागी होणार; समान काम, समान वेतनासह प्रलंबित मागण्यांवर शासनाच्या उदासीनतेविरोधात तीव्र असंतोष

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे राज्य शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे. वारंवार निवेदने, चर्चा आणि पाठपुरावा करूनही मागण्यांची पूर्तता होत नसल्याने अखेर महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी संघटनेने १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात राज्यातील जवळपास ३४ हजार न्यायालयीन कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती नागपूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत साखळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

न्यायालयीन कर्मचाऱ्यांना सन २००६ पासून प्रस्तावित असलेली वेतनवाढ, सुधारित वेतनश्रेणी, सेवाशर्ती, जुनी पेन्शन योजना लागू करणे, विविध वेतन आयोगांच्या शिफारशींची अंमलबजावणी करणे, तसेच समान कामासाठी समान वेतन देणे यांसह अनेक महत्त्वपूर्ण मागण्या प्रलंबित आहेत. या मागण्यांबाबत शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी संघटनेची मागणी आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांना दैनंदिन कार्यालयीन कामकाज करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. कार्यालयीन कामकाजातील जाचक अटी रद्द करणे, कर्मचाऱ्यांच्या कामकाजात कंत्राटी कर्मचाऱ्यांचा प्रशासनाकडून होणारा वाढता हस्तक्षेप थांबविणे, न्यायालयीन संवेदनशील प्रकरणे हाताळण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यां ऐवजी नियमित कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, तसेच न्यायिक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांच्या निराकरणासाठी स्वतंत्र न्यायाधिकरण स्थापन करणे, या मागण्यांचाही समावेश आहे.

दोन वर्षांपासून वेतनश्रेणीचा प्रस्ताव शासनदरबारी प्रलंबित

संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत झालेल्या चर्चेनंतर सुधारित वेतनश्रेणी बाबतचा प्रस्ताव ३१ जानेवारी २०२५ रोजी, मुंबई उच्च न्यायालयाकडून महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र, जवळपास दोन वर्षांचा कालावधी उलटूनही या प्रस्तावावर शासनाकडून कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. केवळ वेतनश्रेणीच नव्हे, तर इतर मागण्याही अद्याप प्रलंबित आहेत. शासनाकडून या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले जात नसल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये नैराश्य आणि असंतोष वाढत असल्याचे साखळकर यांनी स्पष्ट केले. न्यायव्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असलेल्या कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष का? न्यायालयीन व्यवस्थेचे कामकाज सुरळीत चालविण्यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. न्यायालयीन अभिलेखांचे व्यवस्थापन, प्रकरणांची नोंदणी, सुनावणीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता आणि न्यायालयीन प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी हे कर्मचारी पार पाडतात. असे असतानाही त्यांच्या वेतन, सेवाशर्ती आणि सामाजिक सुरक्षेशी संबंधित प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित राहणे ही गंभीर बाब आहे.

शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे केवळ प्रशासकीय विषय म्हणून न पाहता त्यांच्या न्याय्य हक्कांचा प्रश्न म्हणून पाहावे, अशी भूमिका संघटनेने मांडली. वारंवार पाठपुरावा करूनही मागण्यां बाबत ठोस कार्यवाही होत नसल्याने आता आंदोलना शिवाय पर्याय उरलेला नाही. त्यामुळे १७ नोव्हेंबर पासून राज्यव्यापी बेमुदत संप पुकारण्यात येणार असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, असे आवाहन संघटनेने केले आहे. पत्रपरिषदेला नागपूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत साखळकर, मनोज नागोसे, अमन पंचवटीकर, नरेंद्र उमरेडकर, ताराचंद चतुर, अनिल कोहळे, गणेश पटवेकर आणि पंकज कामडी उपस्थिती होती.

सचिन बेंडभर यांच्या हस्ते बारामती येथील प्रतिभावंत साहित्यिकांचा सन्मान

पंचक्रोशी दिवाळी अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, पुणे

भाग्यलक्ष्मी फाउंडेशन, चंदुकाका सराफ व पंचक्रोशी प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या दीपावली अंक प्रकाशन व सन्मान सोहळा या कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या हस्ते पंचक्रोशी या दीपावली अंकाचे प्रकाशन व बारामती तालुक्यातील प्रतिभावंत साहित्यिकांचा सन्मान शनिवार दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी दहा वाजता बारामती येथे करण्यात आला.

महाराष्ट्रातील प्रसिद्ध साहित्यिक सचिन बेंडभर यांच्या हस्ते पंचक्रोशी या दिवाळी अंकाचे प्रकाशन व बारामती तालुक्यातील प्रतिभावंत साहित्यिकांचा सन्मान सोहळा नुकताच पार पडला. यावेळी विद्या जाधव, प्रा. विजय काकडे, सोमनाथ सुतार यांच्यासह इतर अनेक कवी लेखक उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाला ज्येष्ठ साहित्यिक प्रा. रवींद्र कोकरे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तर संभाजी नाना होळकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाला अंजली अत्रे, मृणालिनी कानिटकर, माधव जोशी, लक्ष्मण शिंदे, मंगला बोरावके, बाळासो भोसले, चंद्रकांत गीते, दत्तात्रय महाराज गावडे, गीतकार जगदीश पिंगळे, लेखक युवराज खलाटे, लेखक संजय मोरे, सागर वायाळ, प्राध्यापक कुंडलिक कदम आणि प्रमिला काटे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल शिंदे, सुचिता जाधव आणि शर्मिला गायकवाड यांनी केले. तर बाळासाहेब करचे कर्चे यांनी आभार मानले.

अंधाराकडून प्रकाशाकडे: अशफाक कुरेशींनी साधली महावितरणच्या 'अभय योजने'तून सुवर्णसंधी

३ लाख ३६ हजारांची घसघशीत सवलत मिळवत झाले वीज बिल थकबाकी मुक्त

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



आयुष्यात कधीकधी संकटांची मालिका अशी काही मागे लागते की, माणूस आर्थिक विळख्यात अडकत जातो. वीजबिल भरता आले नाही म्हणून वीजपुरवठा खंडित झाला आणि त्यानंतर काळोखात गेलेले दिवस, हा अनुभव अंगावर काटा आणणारा असतो. नागपूर शहरातील गांधीबाग विभागांतर्गत येणाऱ्या बिनाकी उपविभागाचे शांतीनगर शाखा कार्यालयाचे एक सर्वसामान्य ग्राहक अशफाक कुरेशी अहमद यांच्या आयुष्यातही अगदी असंच काहीसं घडलं होतं. वाढत्या आर्थिक अडचणींमुळे २७ मे २०२१ रोजी त्यांच्या घरचा वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्यात आला होता. त्यानंतर तब्बल पाच वर्षे त्यांच्या घरात आणि आयुष्यात अंधाराचीच काळी छाया राहिली. २४ ऑक्टोबर २०२६ रोजी हातात आलेले वीजबिल पाहिले तेव्हा तब्बल ८ लाख २९ हजार ८६७ रुपयांची प्रचंड थकबाकी त्यांच्या नावावर जमा झाली होती. एका सर्वसामान्य माणसासाठी ही रक्कम म्हणजे जणू डोंगरच होता, ज्याची परतफेड करणे त्यांना अशक्यप्राय वाटत होते.

परंतु, म्हणतात ना की संकटाच्या प्रत्येक रात्रीनंतर एक नवी सकाळ उगवतेच. महावितरणने आणलेली 'अभय योजना २०२६-२७' अशफाक कुरेशी यांच्यासाठी खऱ्या अर्थाने संजीवनी ठरली. जेव्हा त्यांनी या योजनेची माहिती घेतली, तेव्हा त्यांच्या लक्षात आले की ही केवळ थकबाकी वसुलीची मोहीम नसून, अंधारात गेलेल्या ग्राहकांना पुन्हा सन्मानाने उजेडात आणण्याची एक सुवर्णसंधी आहे. या योजनेचा संपूर्ण अभ्यास करून त्यांनी हिंमत केली आणि महावितरणकडे ४ लाख ९३ हजार ६५० रुपयांचा एकरकमी भरणा केला. विशेष म्हणजे, महावितरणच्या बिनाकी उपविभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता विवेक राऊत, शांतीनगर शाखा कार्यालयाचे सहायक अभियंता सुबोध मंडपे यांसह नरेश मालखेडे, अभिनव वाचासुंदर आणि शाहिद अख्तर या कर्मचाऱ्यांनी दिलेले मोलाचे सहकार्य व मार्गदर्शनामुळे अशफाक कुरेशी यांना या योजनेत सहभागी होणे अत्यंत सुलभ झाले आणि त्यांचे आयुष्यच बदलून गेले.

महावितरणच्या या अभय योजनेमुळे अशफाक कुरेशी यांना तब्बल ३ लाख ३६ हजार २२० रुपयांची म्हणजे जवळपास ४१ टक्क्यांची घसघशीत सवलत मिळाली. यामध्ये त्यांच्या मूळ थकबाकीवरील तब्बल २ लाख ४ हजार ६४७ रुपयांचे व्याज, ७ हजार ७११ रुपयांचे विलंब आकार आणि ४४३ रुपयांचे मागणी आकार पूर्णपणे माफ झाले. विशेष म्हणजे, ठरलेल्या मुदतीत मूळ थकबाकीचा एकरकमी भरणा केल्यामुळे त्यांना 'अर्ली बर्ड रिबेट' अंतर्गत तब्बल १ लाख २३ हजार ४११ रुपयांची अतिरिक्त सवलत देण्यात आली. जे बिल ८ लाखांच्या वर पोहोचले होते, ते संकट या योजनेमुळे सहजरित्या दूर झाले आणि त्यांच्या कुटुंबाला पुन्हा एकदा हसण्याखेळण्याचे व उजेडाचे दिवस परत मिळाले.

अशफाक कुरेशी अहमद यांच्यासारखीच परिस्थिती आज अनेक कुटुंबांची आहे. ज्या ग्राहकांचा वीजपुरवठा थकबाकीपोटी खंडित झाला आहे, त्यांच्यासाठी महावितरणची ही 'अभय योजना' म्हणजे अंधारातून बाहेर पडून प्रगतीच्या मार्गावर चालण्याची एक उत्तम संधी आहे. व्याजाच्या आणि दंडाच्या ओझ्याखाली दबून न जाता, या योजनेत सहभाग नोंदवावा, बिलाच्या विळख्यातून आपली सुटका करून घ्यावी आणि आपल्या घरात पुन्हा एकदा आनंदाचा व प्रगतीचा प्रकाश आणावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

थोडक्यात

मनसर येथे दिव्यांग बांधवांना दिवाळीची भेट, मोफत शिधा किटचे वितरण!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष पुढाकारातून मनसर येथे उपक्रम; दिव्यांग लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

दिवाळीचा सण प्रत्येकाच्या आयुष्यात आनंद आणि समाधान घेऊन यावा, या सामाजिक भावनेतून शिवसेनेच्या वतीने मनसर येथे दिव्यांग बांधव व भगिनींना दिवाळीनिमित्त मोफत शिधा किटचे वितरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विशेष पुढाकारातून या शिधा किटचे वितरण राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्या माध्यमातून करण्यात आले.



मनसर ग्रामपंचायत परिसरात आयोजित या उपक्रमात गावातील दिव्यांग लाभार्थ्यांना शिधा किटचे वाटप करण्यात आले. सणासुदीच्या काळात गरजू कुटुंबांना मदतीचा हात देत त्यांच्या दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा या उपक्रमामागील उद्देश होता. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदत पोहोचविणे, हीच खरी लोकसेवा असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. याप्रसंगी शिवसेना रामटेक उपतालुका प्रमुख राजकुमार खोब्रागडे, सरपंच कैलास नरुले, समाजसेवक सोनू तिवारी, पेद्दा रेड्डी, संजय राले आणि सौरव मेंढेकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळला व्यक्तीचा मृतदेह; परिसरात खळबळ

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेक तालुक्यातील मनसर येथील प्रभाग क्रमांक २ मधील दिलीप पिपरोल (वय ५२) यांचा मृतदेह घरात फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप पिपरोल हे आपल्या घरात एकटे राहत होते. त्यांचे इतर नातेवाईक जवळच वास्तव्यास होते. शुक्रवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या दरम्यान नातेवाईक त्यांना उठविण्यासाठी घरी गेले असता ते फासावर लटकलेल्या अवस्थेत आढळून आले. ही बाब लक्षात येताच नातेवाईकांनी आरडाओरड केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली.



घटनेची माहिती मिळताच रामटेकचे ठाणेदार राजेश कुमार थोरात यांच्यासह नरेश वरखडे, श्याम रामटेके, संतोष परतेती, स्वप्निल होडगीर, प्रफुल्ल रंदाई आदी पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी रामटेक येथील उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्याची प्रक्रिया सुरू केली. दरम्यान, दिलीप पिपरोल यांनी टोकाचे पाऊल उचलण्यामागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. याप्रकरणी रामटेक पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू आहे.

विदर्भ साहित्य संघाच दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

दीपावलीच्या निमित्ताने विदर्भ साहित्य संघाच्या वतीने शुक्रवारी ग्रंथसहवास येथे आयोजित दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रदर्शनाच्या माध्यमातून साहित्यप्रेमींना विविध दिवाळी अंकांचे अवलोकन करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. याप्रसंगी ग्रंथालय भारतीचे कार्याध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणीचे सदस्य रवींद्र पांडे, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी, उपाध्यक्ष बाळ कुळकर्णी, सरचिटणीस विलास मानेकर, ग्रंथालय संचालक डॉ. स्वाती मोहरील, शुभदा फडणवीस, प्रकाश एदलाबादकर, माधुरी साकुळकर, संदीप बारस्कर, आसावरी तिडके, अनिल इंदाणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रदर्शनात मांडण्यात आलेल्या विविध दिवाळी अंकांची मान्यवरांनी पाहणी केली. यावेळी डॉ. गिरीश गांधी यांनी वाचनसंस्कृती टिकवून ठेवण्यासाठी अशा प्रदर्शनांचे आयोजन आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. तसेच त्यांनी प्रदर्शनाच्या आयोजनाला शुभेच्छा दिल्या. पंचमीच्या निमित्ताने यावेळी लक्ष्मीपूजनही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. स्वाती मोहरील यांनी केले, तर श्रीपाद देशपांडे यांनी आभार मानले.

प्रवीण मिश्रा का निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भवानी नगर निवासी प्रवीण मदनमोहन मिश्रा ४२ का निधन हो गया। अंतिम संस्कार रविवार शाम ४ बजे गंगाबाई घाट पर किया जाएगा।

शेखर पाटनकर यांचे निधन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक शेखर भाऊ नागोरावजी पाटनकर यांचे निधन झाले आहे. रविवारी त्यांचेवर दुपारी १२ वजता अंतिम संस्कार न्यू इंदोरा, लाइन नंबर ७ येथून वैशाली घाट येथे करण्यात येईल. त्यांच्या मागे बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या निधनामुळे सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

ई-पीक पाहणीची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत!

नेटवर्क नसलेल्या भागांत ऑफलाइन नोंदणीची सुविधा, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा, शेतरस्त्यांना प्राधान्य, पीक विम्याच्या तक्रारींची मंत्रिमंडळ उपसमितीत दखल, फळबागा वाचविण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत बोअरवेलला परवानगी

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

शेतकऱ्यांची मागणी लक्षात घेऊन ई-पीक पाहणीची मुदत ३० नोव्हेंबरपर्यंत वाढविण्यात आली असून, मोबाईल नेटवर्क नसलेल्या भागांत शेतकऱ्यांना ऑफलाइन पद्धतीनेही ई-पीक पाहणी करता येणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यातील ३ कोटी ४५ लाख शेतकऱ्यांपैकी आतापर्यंत ३ कोटी २० लाख शेतकऱ्यांची ई-पीक पाहणी पूर्ण झाली असून, उर्वरित २५ लाख शेतकऱ्यांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच दुष्काळी परिस्थितीत शेतरस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेणे, पीक विम्याच्या तक्रारींचे निराकरण, फळबागा वाचविण्यासाठी बोअरवेलला परवानगी आणि पाणी बचतीसाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यात येत असल्याची माहितीही महसूल मंत्री बावनकुळे यांनी दिली. यासंदर्भातील परिपत्रक जारी करण्यात आले आहे.

ई-पीक पाहणीसाठी ऑफलाइन सुविधाही उपलब्ध

राज्यातील अनेक भागांत मोबाईल नेटवर्क उपलब्ध नसल्याने ई-पीक पाहणी करताना शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. त्यामुळे ई-पीक पाहणीची मुदत वाढविण्याबरोबरच नेटवर्क नसलेल्या भागांत ऑफलाइन पद्धतीने नोंदणी करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली होती. ही मागणी शासनाने मान्य केली आहे. आता ई-पीक पाहणीसाठी ऑनलाइन पद्धतीसोबतच ऑफलाइन सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. ३० नोव्हेंबरपर्यंत शेतकऱ्यांनी ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन बावनकुळे यांनी केले.

पीक विमा कंपन्यांच्या तक्रारींची उपसमितीत दखल

पीक विमा कंपन्यांविरोधात शेतकऱ्यांच्या असलेल्या तक्रारी आगामी मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मांडण्यात येणार आहेत. मागील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मोठ्या प्रमाणावर तक्रारींचे निराकरण करण्यात आले होते. पीक विमा कंपन्यांचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. त्यांना दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर करण्यात आलेले संपूर्ण पंचनामे देण्यात आले आहेत. त्यामुळे पीक विम्याच्या प्रक्रियेत शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण येऊ नये, याची काळजी राज्य सरकार घेत असल्याचे ते म्हणाले.

सिमेंट रस्त्याऐवजी शेतरस्त्यांना प्राधान्य

दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यावर राज्य सरकारने भर दिला आहे. यावर्षी जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) निधीतून सिमेंट रस्त्यांची कामे केली जाणार नाहीत. या कामांना स्थगिती देण्यात आली असून, त्याऐवजी मोठ्या प्रमाणावर शेतरस्ते तयार करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री बळीराजा शेत-पाणंद रस्ते योजनेला गती देण्यासाठी प्रत्येक विधानसभा मतदारसंघात आमदार अध्यक्ष असतील, तर त्यांच्यासोबत सहअध्यक्षांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील जवळपास १२५ विधानसभा मतदारसंघांमध्ये सहअध्यक्ष नियुक्त करण्यात आले आहेत.

आमदारांनी तातडीने आपल्या मतदारसंघात बैठका घेऊन जास्तीत जास्त शेतरस्त्यांची कामे सुरू करावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. या कामांमध्ये शेतमजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासोबतच व्ही.बी. रामजी योजनेची जोड देण्यात येणार आहे. डीपीसीचा निधी आणि आवश्यकतेनुसार



आमदार निधीचाही वापर करून शेतरस्त्यांची कामे पूर्ण करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. दुष्काळी परिस्थितीत ग्रामीण भागातील मजुरांना काम आणि शेतकऱ्यांना शेतापर्यंत जाण्यासाठी रस्ते मिळावेत, हा यामागील उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

विकासासाठी मतदारसंघ पुनर्रचना आवश्यक

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची पुनर्रचना विकासाच्या दृष्टीने आवश्यक असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. सध्या अनेक मतदारसंघांचा भौगोलिक विस्तार मोठा आहे. रामटेक लोकसभा मतदारसंघात जवळपास सहा विधानसभा मतदारसंघांचा समावेश असून, एवढ्या मोठ्या क्षेत्रात खासदारांना विकासकामे करताना अडचणी येतात. अमरावती लोकसभा मतदारसंघाचा विस्तार जवळपास ३५० किलोमीटरपर्यंत आहे, तर रामटेक मतदारसंघात नागपूरहून जवळपास २५० किलोमीटरपर्यंत प्रवास करावा लागतो. माझ्या कामठी विधानसभा मतदारसंघात सुमारे साडेपाच लाख मतदार आणि तीन तालुके आहेत. सकाळपासून रात्री उशिरापर्यंत काम करूनही संपूर्ण मतदारसंघातील प्रश्न सोडविणे कठीण जाते. त्यामुळे मतदारसंघ लहान असतील, तर लोकप्रतिनिधींना जनतेशी अधिक संपर्क ठेवता येईल आणि त्यांच्या समस्यांकडे अधिक लक्ष देता येईल. अधिकाधिक लोकप्रतिनिधींनी प्रशासनासोबत काम केल्यास सरकारी योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविणे सोपे होईल, असे त्यांनी नमूद केले.

मतदारसंघ पुनर्रचनेचे नेमके सूत्र काय असेल, हे विधेयक आल्यानंतर स्पष्ट होईल. याबाबत सध्या निश्चित माहिती नसल्याचेही त्यांनी सांगितले. त्याचवेळी लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळणेही महत्त्वाचे आहे. महिला लोकप्रतिनिधी विधानसभा आणि लोकसभेत जाऊन विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्राच्या उभारणीत योगदान देऊ शकतात, असे ते म्हणाले.

एनडीएचा विस्तार सकारात्मक; काँग्रेसकडे विकासाचा दृष्टिकोन नाही

एनडीएमध्ये अधिकाधिक सहकारी पक्ष सहभागी होणे ही सकारात्मक बाब असून, एनडीए अधिक मजबूत होणे देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे आहे, असे बावनकुळे यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर आणि विकसित भारताच्या संकल्पनेवर विश्वास असल्यामुळे एनडीएतील सहकारी पक्षांची संख्या वाढत असल्याचे ते म्हणाले.

यावेळी काँग्रेसवर टीका करताना ते म्हणाले की, काँग्रेस पक्ष हळूहळू कमकुवत होत चालला आहे. इंडिया आघाडीला आपले सहकारी पक्ष सांभाळता येत नाहीत. काँग्रेसकडे विकसित भारतासाठी कोणताही ठोस विकास आराखडा किंवा दृष्टिकोन नाही. दररोज नकारात्मकता निर्माण करणे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका करणे एवढेच काँग्रेसचे काम सुरू आहे. काँग्रेसमध्ये केवळ मतभेदच नाहीत, तर मनभेदही आहेत. पक्षातील अंतर्गत संघर्षामुळे त्यांचे सहकारी पक्ष त्यांना सोडून जात आहेत, अशी टीका त्यांनी केली.

राहुल गांधींचे फोन टॅपिंगचे आरोप निराधार

राहुल गांधी यांनी केलेल्या फोन टॅपिंगच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे यांनी हे आरोप निराधार असल्याचे म्हटले. देशाचे आणि माध्यमांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी राहुल गांधी दररोज नवनवीन विधाने करतात. फोन टॅपिंगच्या आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नाही, असे ते म्हणाले.

२०२९ मध्ये एनडीएचा एवढा मोठा विजय होईल की राहुल गांधी त्याची कल्पनाही करू शकणार नाहीत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२४ मध्ये देशासमोर विकसित भारताचा जो संकल्प मांडला आहे, तो पूर्ण करण्यासाठी सरकार काम करीत आहे. विकसित भारताच्या विकासाच्या अजेंड्यामुळे विरोधकांची राजकीय जमीन सरकत असल्याची त्यांना भीती वाटत असल्याचेही बावनकुळे यांनी सांगितले.

कोराडी, खापरखेडा वीज प्रकल्पांसाठी आता सांडपाण्याचा वापर

नागपूरमध्ये पाण्याचा साठा कमी झाल्याच्या पार्श्वभूमीवर कोराडी आणि खापरखेडा औष्णिक विद्युत प्रकल्पांसाठी पाण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी पेंच आणि तोतलाडोह धरणांतील पाण्याची आवश्यकता आता राहणार नाही. या प्रकल्पांसाठी असलेले पाण्याचे आरक्षण सोडून देण्यात आले आहे. आता नागपूर महानगरपालिकेच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून उपलब्ध होणाऱ्या टर्शरी ट्रीटेड वॉटरचा वापर वीज प्रकल्प चालविण्यासाठी करण्यात येणार आहे.

त्यामुळे पिण्यासाठी आणि शेतीसाठी आवश्यक असलेले पाणी वीज प्रकल्पांसाठी वापरण्याची गरज राहणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकारामुळे नागपूर महानगरपालिकेच्या प्रक्रियायुक्त सांडपाण्यावर वीज प्रकल्प चालविण्याचा निर्णय प्रत्यक्षात उतरल्याचे सांगत बावनकुळे यांनी त्यांचे आभार मानले. पाण्याच्या नियोजनाच्या दृष्टीने हा मोठा बदल असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संत्रा बागा वाचविण्यासाठी १५ डिसेंबरपर्यंत बोअरवेलची मुभा

दुष्काळी परिस्थितीमुळे संत्रा उत्पादकांसह फळबागायतदार शेतकरी अडचणीत आहेत. ज्या ठिकाणी संत्र्याच्या बागा सुकत आहेत, तेथील बागा वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना १५ डिसेंबरपर्यंत बोअरवेल करण्याची परवानगी देण्यात आली आहे. यापूर्वी बोअरवेल करण्यावर असलेली स्थगिती उठविण्यात आली आहे. नागपूर, विदर्भासह राज्यातील संत्री, मोसंबी, चिकू, आंबा आदी फळपिके वाचविण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

नागपूर जिल्ह्यात पाच हजार रिचार्ज शाफ्ट आणि जलतारा

पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळी वाढविण्यासाठी नागपूर जिल्ह्यात पाच हजार रिचार्ज शाफ्ट उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याशिवाय पाच हजार जलतारा तयार करण्याचा संकल्प करण्यात येत आहेत. शेतात, गावात आणि परिसरात पडणारे पावसाचे पाणी थेट जमिनीत मुरावे, यासाठी या उपाययोजना केल्या जात आहेत.

नंदनवनात साजरी झाली सुरमई दिवाळी पहाट

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नंदनवन कॉलनी नागरिक समिती आणि हार्मोनि इव्हेंट्स, नागपूरद्वारा स्थानिक नंदनवन कॉलनी बगीच्यामध्ये आयोजित सुमधुर मराठी व हिंदी गाण्यांचा सुरेल मैफिलीने नंदनवनातील दर्दी रसिकांची मने जिंकून घेतली.राजेश समर्थ यांच्या सुंदर संयोजनात आणि श्वेता शेलगावकर यांच्या सदाबहार निवेदनात ज्येष्ठ गायक कलावंत गुणवंत घटवाई,आकांक्षा देशमुख, श्याम बापते,रवी सातफळे यांनी "उठी उठी गोपाळा"या भूपाळी गीताने कार्यक्रमाची सुरुवात करून,"ज्योती कलश छलके, कुहू कुहू बोले कोयलिया, मंदवारा, सुनो सजना, क्षेत्र विठ्ठल-तीर्थ विठ्ठल, कानडा राजा पंढरीचा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव,"यांसारखे विविध सुरेल भजन/गीतांचा नजराना सादर करीत,स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या" ने मजसी ने,परत मातृभूमीला"या हृदयस्पर्शी गीताने शेवट केला.

दिवाळी पहाटची सुरुवात जेष्ठ नागरिक सुधीर तुपकर व प्रवीणभाई शहा यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलनाने झाली. नंदनवन कॉलनी नागरिक समितीचे मुख्य संयोजक आणि मनपा प्रभाग २७चे नगरसेवक एडवोकेट डॉ.निलेश गायधने यांच्या संकल्पनेतून संपन्न झालेल्या या कार्यक्रमाला आमदार कृष्णाजी खोपडे, आमदार मोहनजी मते, काँग्रेस राष्ट्रीय प्रवक्ता अतुलजी लोंढे, श्रीकांतजी आगलावे,दिव्याताई धुरडे, रजनीताई वानखेडे, पिंटूजी गिऱ्हे, शारदाताई बारई, तानाजी वनवे,गणेशजी चरलेवार, राजूजी गोतमारे आदी मान्यवर उपस्थित होते.



कायक्रम यशस्वीतेसाठी दिनेश मेहर,डॉ. शांतीदास लुंगे,प्रकाश गायधने, प्रवीण देशकर, विजय देवगडे,अपार टिकस,सचिन वानखेडे, आशिष काळसे, रुपेश आठवले, किरण ढोबळे,अजय देवगडे,शितल देवगडे, रचना दवंडे,डॉ.राहुल पेठे, निकी कोहळे,प्रवीण निखाडे आधी आदि पदाधिकाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमात उपस्थित सर्व रसिकांना विविध गाण्यांसोबत अल्पोपहारची सुद्धा मेजवानी मिळाली, हे विशेष !.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह'


घरकुल मंजुरी, वनपट्टे वितरण, आधार व जात वैधता शिबिरे, नेत्र तपासणीसह विविध उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

क्रांतिसूर्य भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त अपर आयुक्त,आदिवासी विकास विभाग व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाकडून दि. १३ ते १८ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत 'जनजातीय गौरव दिवस सेवा सप्ताह' आयोजित करण्यात आला आहे. 'अनुभव आदर्श संस्कृतीचा, महोत्सव आदिवासी कलागुणांचा, विषय आमच्या स्वाभिमानाचा' या संकल्पनेवर आधारित या सप्ताहात शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ थेट आदिवासी बांधवांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. भगवान बिरसा मुंडा यांच्या स्मृतीनिमित्त दरवर्षी १५ नोव्हेंबर हा दिवस 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने जिल्ह्यात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरी शबरी घरकुल योजनेतून लाभार्थ्यांना आधार

नागपूर शहरात बेघर व कच्ची घरे असलेल्या एकूण ४५ शहरी आदिवासी कुटुंबांना या योजनेचा लाभ देण्यात आला असून, १३ नोव्हेंबर रोजी आदिवासी विकास भवन येथे त्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या योजनेअंतर्गत नागपूर



शहरासाठी शासनाने २,००० घरकुलांचा लक्षांक दिला असून यामध्ये प्रत्येक लाभार्थ्याला पक्के घर बांधण्यासाठी एकूण २.५० लाख रुपये अनुदान चार टप्प्यांत (अनुक्रमे ४० हजार, ८० हजार, ८० हजार व ५० हजार रुपये) थेट लाभार्थी हस्तांतरणाद्वारे बँक खात्यात जमा केले जाणार आहे. दि. १५ रोजी फुटाळा येथील भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्यालगतील परिसरात आदिवासी विकास विभाग व नागपूर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेश प्रदान केले जातील. सप्ताहातील प्रमुख उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

या सेवा सप्ताहामध्ये केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनेतून धनादेश वितरण, शबरी घरकुल योजनेचा लाभ, आधार कार्ड शिबीर, वनहक्क दावे (वनपट्टे) वाटप, पात्र लाभार्थ्यांना वैयक्तिक लाभाच्या योजना आणि महिला बचत गटांसाठी स्वयंरोजगार कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यासोबतच नेत्र तपासणी शिबीर, जात वैधता प्रमाणपत्र शिबीर, कौशल्य विकास कार्यक्रम, स्मारक स्वच्छता मोहीम आणि दिघोरी येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना चष्मे वाटप असे उपक्रमही पार पडणार आहेत.

दि. १६ नोव्हेंबर रोजी आधार कार्ड शिबीर, पात्र लाभार्थ्यांना वनपट्टे आदेशाचे वितरण आणि आदिवासी समुदायातील सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सची विशेष बैठक आयोजित करण्यात आली आहे. दि. १७ नोव्हेंबर रोजी नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले असून दिघोरी येथील आदिवासी मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींना मोफत चष्मे वाटप केले जातील. याच दिवशी विद्यापीठ कुलगुरू अध्यासन केंद्राचा कार्यक्रमही पार पडेल.

समारोपाच्या दिवशी बुधवार, दि. १८ रोजी महिला बचत गटांसाठी स्वयंरोजगार कार्यक्रम, जात वैधता प्रमाणपत्र शिबीर आणि कौशल्य विकास कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. वासोबतच पारधी समाजासाठी पारधी सखींची कार्यशाळा देखील घेण्यात येणार आहे. आदिवासी बांधवांनी या सर्व उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी उमेश काशिद यांनी केले आहे.

थोडक्यात

आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांना महावितरणतर्फे विनम्र अभिवादन!



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान आणि आधुनिक भारताचे दूरदर्शी शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त महावितरणतर्फे त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. काटोल रोडवरील नागपूर परिमंडलाच्या विद्युत भवन या प्रशासकीय मुख्यालयात आयोजित कार्यक्रमात नेहरूजींच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेस माल्यार्पण केले. यावेळी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पंडितजींच्या प्रतिमेला आदरांजली वाहत त्यांच्या राष्ट्रनिर्मितीतील अतुलनीय योगदानाचे स्मरण केले. याप्रसंगी वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) सुधीर टेकाम, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह अतिरिक्त कार्यकारी अभियंता अजित जिचकार, उप कार्यकारी अभियंता जयंत बानेरकर, मो. फुरखान सय्यद, गौरव चौधरी, अंजली देशपांडे यांच्यासह महावितरणचे अनेक अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भंडाऱ्यात आज आदिवासी हल्बा समाजाचा उपवर-वधू परिचय मेळावा व गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ

दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा

आदिवासी हल्बा युवक समिती, भंडारा यांच्या वतीने समाजातील उपवर-वधूंसाठी परिचय मेळावा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम सकाळी ११.३० वाजता बावणे कुणबी समाज मंगल कार्यालय, पोस्ट ऑफिसच्या मागे, भंडारा येथे पार पडणार आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन भंडारा पोस्ट ऑफिसचे पोस्टमास्टर भोला रामजी सोनकुसरे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अर्बन बँक भंडाराचे संचालक धनंजयजी दलाल राहणार आहेत.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेविका उषाताई ऋषी नंदनवार, डी.टी.बी. मार्केट भंडाराचे अध्यक्ष बंडुभाऊ तानबाजी बारापात्रे तसेच नाबार्ड बँक, मुंबईचे मॅनेजर राकेशजी कुंभारे उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्याचा मुख्य उद्देश समाजातील विवाहयोग्य युवक-युवतींना एकमेकांची ओळख करून देण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच समाजातील शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून इतर विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणे हा आहे. समाजातील युवक-युवती व पालकांनी या परिचय मेळाव्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजक आदिवासी हल्बा युवक समिती, भंडारा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

आदिवासी क्रांतिकारकांच्या इतिहासाची ओळख करून दिली जाईल : मनोहर कुंभारे

भाजपतर्फे १८ नोव्हेंबरपर्यंत जनजातीय गौरव सप्ताहाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर





बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त, भारतीय जनता पार्टी ११ ते १८ नोव्हेंबर दरम्यान देशभरात 'आदिवासी अभिमान सप्ताह' साजरा करत आहे. या आठवड्यात नागपूर ग्रामीण जिल्ह्यात, आदिवासी समाजाचा गौरवशाली इतिहास, स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचे योगदान आणि केंद्र सरकारच्या विविध विकास योजनांची माहिती जनतेला दिली जाईल. ही माहिती भाजप नागपूर ग्रामीण जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे यांनी दिली. भगवान बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर रोजी झाला होता. ही घटना १८७५ मध्ये झारखंडमधील खुंटी जिल्ह्यातील उलिहातू गावात घडली. त्यांनी ब्रिटिश राजवटीविरुद्ध 'उलगुलन' चळवळीचे नेतृत्व केले आणि आदिवासी समाजाची जमीन, जंगले आणि आत्मसन्मान जपण्यासाठी लढा दिला.'आमचा देश, आमचे राज्य' असा अर्थ असलेली 'अबू डिशुम, अबू राज' ही घोषणा देणारे बिरसा मुंडा यांना आदिवासी समुदाय आदराने 'धरती आबा' म्हणून संबोधतो. तिलका मांझी, सिदो-कान्हू, चांद भैरव, फूल-जानो, राणी दुर्गावती, तात्या भिल, वीर नारायण सिंह, कोमाराम भीम आणि राणी गायदिन्ल्यु यांसारख्या अनेक आदिवासी वीरांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. या महान क्रांतिकारकांचे संघर्ष, त्याग आणि इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हा आदिवासी अभिमान सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे. केंद्र सरकारने १५ नोव्हेंबर २०२१ हा दिवस 'आदिवासी अभिमान दिन' म्हणून अधिकृतपणे घोषित केला आहे. आदिवासी समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य आणि आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी प्रधानमंत्री जन्मन योजना, धरती आबा आदिवासी ग्राम उत्कर्ष अभियान, एकलव्य मॉडेल निवासी शाळा, वन धन विकास केंद्रे आणि सिकल सेल निर्मूलन मोहीम यांसारख्या विविध योजना राबविण्यात येत आहेत.

आदिवासी अभिमान सप्ताह हा केवळ एक उत्सव नसून, आदिवासी समाजाचे शौर्य, त्याग, संस्कृती, परंपरा आणि आत्मसन्मान यांचा गौरव करण्याची एक प्रतिज्ञा आहे. या मोहिमेद्वारे आदिवासी स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाला व्यापक मान्यता देणे, समाजाला मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे आणि सरकारी योजनांचे लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचतील याची खात्री करणे, यासाठी प्रयत्न केले जातील. मनोहर कुंभारे यांनी सांगितले की, भारतीय जनता पक्ष आदिवासी समाजाच्या सन्मान, सुरक्षा, संस्कृती आणि सर्वांगीण विकासासाठी नेहमीच कटिबद्ध राहिला आहे आणि यापुढेही राहील.

अदानींच्या फायद्यासाठी सरकारी तिजोरीची लूट; कराडी प्रकल्पाची मंजुरी तात्काळ रद्द करा

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

अदानींच्या कराडी एनर्जी प्रकल्पाला परवानगी देताना पर्यावरणीय मंजुरीसाठी सुरुवातीला कमी क्षेत्र दाखवण्यात आले. १५०० मेगावॅट क्षमतेच्या या प्रकल्पाचे मूल्य ५७७५ कोटी रुपये असताना ते केवळ ५६ कोटी रुपये दाखवण्यात आले. त्यामुळे सरकारच्या तिजोरीत जमा होणाऱ्या महसुलाचे मोठे नुकसान झाल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. नियमानुसार चार टक्के भरणा अपेक्षित असताना केवळ २ कोटी २७ लाख रुपये जमा करण्यात आल्याचे समोर येत आहे. मग उर्वरित रकमेचे काय झाले? सरकारच्या महसुलाचे नुकसान कोणाच्या फायद्यासाठी केले जात आहे? मंत्रालयातील कोणाच्या आशीर्वादाने हा प्रकार सुरू आहे? असा सवाल वडेट्टीवार यांनी उपस्थित केला. ग्रीन एनर्जीच्या नावाखाली जंगल आणि गाव उद्ध्वस्त करण्याचे काम सुरू आहे. सुरुवातीला कमी जागा दाखवायची आणि अंतिम मंजुरी देताना जागा वाढवून द्यायची, हा प्रकार म्हणजे



अदानींना रेड कार्पेट घालण्याचा प्रकार आहे. या प्रकल्पासाठी वनक्षेत्र, पर्यावरणीय परिणाम आणि महसुलाचे नुकसान यांची स्वतंत्र चौकशी झाली पाहिजे. कराडी प्रकल्पासह नियमबा मंजुरी दिलेल्या प्रकल्पांची चौकशी करून संबंधित मंजुरी तात्काळ रद्द करावी, अशी मागणी त्यांनी केली.

सरकार स्वतः वीज स्वस्तात उपलब्ध करुन देऊ शकत नाही आणि दुसरीकडे तब्बल २३ रुपये दराने वीज खरेदी करत असेल, तर ही जनतेच्या पैशांची उधळपट्टी आहे. ग्रीन एनर्जीच्या नावाखाली सरकारी तिजोरीवर डल्ला मारण्याचा हा प्रकार असून यामागील आर्थिक व्यवहारांची चौकशी झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

वनमंत्री गणेश नाईक झोपले आहेत का?

राज्यात मानव-वन्यजीव संघर्ष गंभीर बनला आहे. वाघांच्या हल्ल्यात सामान्य नागरिकांचा, शेतक-यांचा आणि कामगार महिलांचा जीव जात आहे. वाघ मानवी वस्त्यांमध्ये घुसून हल्ले करत आहेत,मात्र वनमंत्री गणेश नाईक झोपले आहेत का? लोकांच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी सरकारकडे ठोस उपाययोजना का नाहीत?

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे नागपूर येथे आगमन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे दोन दिवसीय दौऱ्यासाठी आज रात्री नागपूर येथे आगमन झाले. आगमनप्रसंगी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रशासनाच्यावतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटील, अप्पर विभागीय आयुक्त वैष्णवी बी, पोलिस उपायुक्त अनिल म्हस्के, सीआएएसएफचे वरिष्ठ अधिकारी मनिंदर सिंग यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा दिनांक १५ नोव्हेंबर रोजी सकाळी गडचिरोलीकडे रवाना होईल. गडचिरोली येथे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित जनजातीय गौरव दिन कार्यक्रम व गोंडवाना विद्यापीठाच्या १४ व्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहतील. त्यानंतर नागपूर येथून मुंबईकडे प्रस्थान करतील.

अवतार मेहेर बाबा गुढवादी आध्यात्मिक गुरू होते : गणेश धर्माळे



दै. सिंहवाणी वृत्त, श्रीरामपूर

माझे येणे शिकविण्यासाठी नाहीतर जागृत करण्यासाठी आहे, प्रेम भक्ती सेवा आणि ईश्वराची प्राप्ती हाच आयुष्याचा खरा मार्ग आहे असा संदेश देऊन लाखो भाविकांचा उद्धार करणाऱ्या मेहेर बाबांना भक्तांनी अवतार मानले,प्रापंचिक व आध्यात्मिक कारणासाठी त्यांनी तब्बल ४४ वर्ष मौन साधना केली त्यांना अनेक संतांचा सहवास लाभला ते गुढवादी आध्यात्मिक गुरू होते असे प्रतिपादन गणेश धर्माळे यांनी उदासी वॉर्ड पुसद येथे केले.

गुरुदेव सेवा मंडळ श्रीरामपूर वतीने पुसद तालुक्यात विविध ठिकाणी ५१ सर्वधर्मीय सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद मिळत असून उषा महाजन यांचे निवासस्थानी सामुदायिक प्रार्थना व भजन संध्या घेण्यात आली. यावेळी राजुभाऊ प्रतापवार,सुभाष डुब्बेवार,कासार समाजभूषण मोहन नागपूरकर,पुरूष भजन प्रमुख नरेश ढाले,कोपरा अध्यक्ष गजानन चव्हाण, शिवलिंग अण्णा पटवे,नरेंद्र गेडाम मंडळाचे अध्यक्ष गणेश धर्माळे प्रामुख्याने उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते अधिष्ठान पूजन करून अवतार मेहेर बाबांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

धुनी दिनानिमित्त धुनी प्रज्वलित करण्यात आली त्यानंतर कस्तुरी धर्माळे हिच्या आदेशानुसार शिस्तबद्ध सामुदायिक प्रार्थना घेण्यात आली. यावेळी धर्माळे पुढे म्हणाले की राष्ट्रसंतांनी सुद्धा सेवेला प्राधान्य दिले व कलियुगात प्रेम भक्ती विना काहीच साध्य होणार नाही सांगितले असून केवळ विज्ञान नाहीतर अध्यात्म आणि विज्ञानाच्या संयोगाने पृथ्वीवर सर्वांचे कल्याण होऊ शकते, यावेळी त्यांनी अनेक संतांची उदाहरणे देत मेहेर बाबांच्या जिवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी भजन संध्या घेण्यात आली,त्यात हार्मोनियम अशोक भगत महाराज,यशवंत भगत तबला अनिल अस्वार, किसन गरडे, किशोर राऊत खंजिरी सुरेश कदम साथसंगत पुंडलिक भालेराव,पंजाब गडदे, श्यामराव देशमाने, कैलास मस्के, लक्ष्मण कदम,गजानन गव्हाणकर, विठ्ठलराव यावले, बाबासाहेब वाघमारे, हरिओम रावते,प्रथमेश गव्हाणकर, सतीश चव्हाण माधव पवार महिला प्रतिनिधी स्मिता धर्माळे,कमल गरडे, डॉ.देवश्री काळबांडे,भूमिका धर्माळे मुक्ता काळबांडे,शर्वरी काळबांडे जान्हवी चेपूरवार यांनी केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश पळसकर यांनी तर आभार अनिल साताळे यांनी मानले, यावेळी करुणा महाजन,संगीता पारसेवार, भावना कोल्पेकवार, क्षितिजा पारसेवार, साची कोल्पेकवार, विजय वन्दे,ओम कोल्पेकवार सह असंख्य मेहेर परिवारातील भक्त उपस्थित होते. महाआरती,राष्ट्रवंदना,जयघोष घेऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

नागपूर संघाची विजयी सलामी, 'अवादा विदर्भ व्हिजन कप' दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धेला प्रारंभ

अकोला संघावर २४ धावांनी मात



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

'अवादा विदर्भ व्हिजन कप दृष्टिहीन क्रिकेट स्पर्धा - २०२६' ला नागपूर आणि अकोला संघांमधील सामन्याने शनिवारी प्रारंभ झाला. पहिल्याच सामन्यात नागपूर संघाने चमकदार कामगिरी करीत अकोला संघावर २४ धावांनी मात केली आणि स्पर्धेत विजयी सलामी दिली. अवादा फाउंडेशनफे असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भ आणि नागपूर येथील आत्मदीपम सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने मुजुमदार क्रिकेट अकादमीच्या मैदानावर या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नागपूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अतुल हरोडे यांच्या नेतृत्वाखालील नागपूर संघाने तीन गडी गमावून १७९ धावा केल्या. नागपूर संघाच्या योगेश घायवत याने १०९ धावांची शानदार खेळी केली. त्याला प्लेअर ऑफ द मॅच घोषित करण्यात आले. प्रत्युत्तरात आनंद बारस्कर यांच्या नेतृत्वाखालील अकोला संघाला सर्व गडी गमावून १५५ धावांपर्यंतच मजल मारता आली. नागपूरकडून चेतन आणि नरेंद्र यांनी प्रत्येकी तीन बळी घेत विजयात महत्त्वाचे योगदान दिले. दुसरा सामना चंद्रपूर संघ विरूद्ध अमरावती संघात झाला; यात चंद्रपूर संघाने ९६ धावांनी अमरावती संघावर मात केली. चंद्रपूर संघाच्या गौरव झाडेला प्लेअर ऑफ द मॅच घोषित करण्यात आले.

या स्पर्धेचे उद्घाटन शुक्रवारी पार पडले. उद्घाटन सोहळ्याला अवादा समूहाचे पंकज उपाध्याय (अवादा इलेक्ट्रो), मृदुल गहलोत, संकल्प दुबे, सौरभ अवचट, अदानी इन्स्टिट्यूट आफ हाईयर एज्युकेशन अँड रिसर्चचे डॉ. कमरान शेख उपस्थित होते. तसेच आत्मदीपम सोसायटी आणि असोसिएशन फॉर प्रमोशन ऑफ ब्लाइंड क्रिकेट इन विदर्भच्या अध्यक्षा जिज्ञासा चावलढाल, उपाध्यक्ष आकाश कुबडे, सदस्य अंजली साखरकर, जयंत गुळकारी, योगेश्वर चावलढाल, गुरुदास राऊल आणि अतुल हरोडे यांची उपस्थिती होती.

यावेळी विदर्भातील दृष्टिहीन क्रिकेटच्या विकासासाठी अवादा फाउंडेशन आणि आत्मदीपम सोसायटी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. दृष्टिहीन क्रिकेटपटूंना योग्य प्रशिक्षण, स्पर्धात्मक व्यासपीठ आणि उच्च स्तरावर प्रतिनिधित्व करण्याच्या संधी उपलब्ध करून देणे हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे.

आजचे सामने (२० षटके)

१. नागपूर संघ विरूद्ध अकोला संघ
नागपूर संघ - १७९/३
अकोला संघ - १५५/१०
नागपूर संघाचा २४ धावांनी विजय

२.चंद्रपूर संघ विरूद्ध अमरावती संघ
चंद्रपूर संघ - २१३/६
अमरावती संघ - ११७/८
चंद्रपूर संघाचा ९६ धावांनी विजय

श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल रिसामा येथे बालदिन साजरा

शिक्षकांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसह विविध खेळांचे आयोजन, विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

श्री स्वामी विवेकानंद पब्लिक स्कूल, रिसामा येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त शनिवार, १४ नोव्हेंबर २०२६ रोजी बालदिन मोठ्या उत्साहात आणि आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, मनोरंजक खेळ आणि आकर्षक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख अतिथी श्री. लीलाधर कलंत्री व डॉ. जितेंद्र वालके यांच्या हस्ते पंडित जवाहरलाल नेहरू आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना



माल्यार्पण व पुष्प अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती सारिका श्रीवास्तव व कु. प्रशिका रंगारी यांनी केले. दिनविशेषाचे वाचन श्रीमती विनेश्वरी भगत यांनी, विशेष प्रार्थना सुधीर उपाध्याय यांनी, तर विशेष बातम्यांचे वाचन श्रीमती वंदना रंगारी यांनी केले. यावेळी शाळेच्या प्राचार्या श्रीमती स्मृती छपरिया यांनी आपल्या प्रेरणादायी विचारांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

बालदिनाचे महत्त्व स्पष्ट करताना प्राचार्या स्मृती छपरिया यांनी पंडित जवाहरलाल नेहरू यांचे जीवनकार्य, त्यांचे विचार आणि बालकांविषयी असलेले विशेष प्रेम याबाबत विद्यार्थ्यांना माहिती दिली. विद्यार्थी हे देशाचे उज्ज्वल भविष्य असून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणासोबतच खेळ, कला, संस्कार आणि सर्जनशीलतेलाही महत्त्व देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी सादर केलेले विविध रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम. शिक्षकांच्या कलागुणांचे दर्शन घडविणाऱ्या या सादरीकरणांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यामुळे शाळेच्या परिसरात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने या खेळांमध्ये सहभाग घेतला. खेळांच्या माध्यमातून सहकार्य, सांघिक भावना, शिस्त आणि खिलाडूवृत्तीचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. सहभागी विद्यार्थ्यांना आकर्षक भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात आले.

याप्रसंगी प्राचार्या स्मृती छपरिया यांनी विद्यार्थ्यांना मनापासून शिक्षण घेण्याचा, नवनवीन गोष्टी आत्मसात करण्याचा आणि जीवनात मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचा संदेश दिला. मुलांमधील सुप्त गुणांना वाव देणे, त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला शाळेच्या व्यवस्थापन मंडळातील राजेश गोयल, लीलाधर कलंत्री, डॉ. ललित कलंत्री, डॉ. जितेंद्र वालके, डॉ. विकास जैन, डॉ. लता जैन, डॉ. भाग्यश्री वालके, श्रीमती रोशनी गोयल व श्रीमती कविता कलंत्री उपस्थित होते. त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना बालदिनाच्या शुभेच्छा देत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

शिक्षकांचे रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम, विविध मनोरंजक खेळ, आकर्षक भेटवस्तू आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे बालदिनाचा हा सोहळा सर्वांसाठी अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले.